दैनिक राज्य लोकतंत्र
www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com
बीड – महाराष्ट्र | वर्ष –४ | अंक–३३८ | गुरूवार, दि.०३ एप्रिल २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

## संपादकीय

### पायउतार होतीलही पण सध्या तरी मोदी एके मोदीच

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा उत्तराधिकारी कोण असेल आणि तो महाराष्ट्रातील असेल का, यावरील चर्चेला देवेंद्र फडणवीस यांच्या स्पष्टीकरणानंतर पूर्णविराम मिळायला हरकत नसावी. शिवसेना नेते खासदार संजय राऊत हे वेगवेगळ्या चर्चांना तोंड फोडण्यामध्ये वाक्बगार आहेत. पंतप्रधान मोदी यांच्या रेशीमबागेतील भेटीनंतर त्यांनी अशाच प्रकारे धागेदोरे जुळवून त्यात सर्वांना गुरफटून टाकण्याचा प्रयत्न केला. अर्थात हा गुंता अतिशय हळूवारपणे सोडवून फडणवीस यांनी आपला चाणाक्षपणा पुन्हा एकदा दाखवून दिला आहे.

### कर भरण्यात महाराष्ट्र एक नंबर

मुंबई–राज्यात २०२४–२५ या मावळलेल्या आर्थिक वर्षात वस्तू आणि सेवा कराचे (जीएसटी) एकूण ३ लाख ५९ हजार कोटी रुपयांचे संकलन झाले. देशस्तरावर भरत झालेल्या १६.७६ लाख कोटी रुपयांच्या एकूण संकलनात हाराष्ट्राचा वाटा हा सर्वाधिक २१.५० टक्के आहे. राज्यात मार्च महिन्यात ३१५३४ कोटींचे संकलन झाले. एप्रिल २०२४ ते मार्च २०२५ या आर्थिक वर्षात राज्यात ३ लाख ५९ हजार ८६ कोटींचे संकलन झाले. गत वर्षाच्या तुलनेत राज्यातील जीएसटी संकलनात सुमारे १४ टक्के वाढ झाली आहे.

# कर्जमाफी करत राहणे हा शेतीवरचा उपाय नाही

## सदाभाऊ खोत स्पष्टच म्हणाले, मला राज्यपाल करावे



**पुणे । प्रतिनिधी**

**राज्यात महायुतीचे सरकार आल्यानंतर विधानसभा निवडणुकांपूर्वी जनतेला दिलेल्या आश्वासनाची आठवण करुन विरोधकांकडून कर्जमाफीचा मुद्दा उपस्थित केला जात आहे. तसेच, शेतकऱ्यांकडून देखील कर्जमाफी कधी होणार असा प्रश्न विचारला जात आहे. कर्जमाफी करत राहणे हा शेतीवरचा कायमस्वरुपी उपाय नसल्याचे मत शेतकरी नेते व माजी मंत्री सदाभाऊ खोत यांनी व्यक्त केले आहे. इंदापुर येथील पत्रकार परिषदेच ते बोलत होते.**

### कर्जमाफी हा शेतीवरचा उपाय नाही

खुली अर्थव्यवस्था शेती क्षेत्रात आली पाहिजे. शेतकऱ्याला जागतिक बाजारपेठा खुल्या झाल्या पाहिजेत, जगातील जागतिक तंत्रज्ञान त्याला मिळालं पाहिजे. मोठी गुंतवणूक शेतीत झाली तरच शेती तग धरू शकते, असे सदाभाऊ खोत यांनी म्हटले. तसेच, आजच जे कर्ज आहे ते शेतकऱ्यांच्या चुकीमुळे नाही तर ते सरकारच्या धोरणांमुळे आहे. या कर्जाची जबाबदारी ही केंद्राने आणि राज्याने घ्यावी परंतु कर्जमाफी करत राहणे हा शेतीवरचा उपाय नाही, असेही त्यांनी म्हटले.

### एफआरपीबाबतही मांडली भूमिका

शेतकरी विरोधी जे कायदे शेड्यूल ९ मध्ये आहेत, त्यामध्ये अत्यावश्यक वस्तू कायदा, कमाल जमीन धारणा कायदा हे पहिल्यांदा रद्द करा. पायाभूत सुविधा उभा राहतील, शेतीला भांडवल कर्जरूपाने उभा राहील. मात्र, ही सर्व बंधने ठेवून शेती क्षेत्रावरचा राबणारा माणूस हा कायम गुलाम राहिला पाहिजे. गुलामावर राज्य करता येतं, आत्मनिर्भर माणसावरती राज्य करता येत नाही. म्हणून साखर कारखानदारी ही मूठभर लोकांच्या हातात ठेवली गेली, असे म्हणत एफआरपीच्या मुद्द्यावरूनही सदाभाऊ खोत यांनी भूमिका स्पष्ट केली.

शेतकरी नेते राजू शेट्टी हे ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या मागण्यांसाठी आक्रमक झाले असून एफआरपीच्या दराबाबत सरकारच्या धोरणावर टीका करत आहेत. तसेच, शेतकरी कर्जमाफीवरुनही ते सरकारला लक्ष्य करत आहेत. दुसरीकडे रयत क्रांती संघटनेचे प्रमुख आणि आ. सदाभाऊ खोत यांनी आता कर्जमाफीच्या मुद्द्यावरुन घुमजाव केल्याचे दिसून येत आहे. आजच जे कर्ज आहे ते शेतकऱ्यांच्या चुकीमुळे नाही तर ते सरकारच्या धोरणांमुळे आहे. या कर्जाची जबाबदारी केंद्राने आणि राज्याने घ्यावी, परंतु कर्जमाफी करत राहणे हा शेतीवरचा उपाय नाही, असे स्पष्टपणे सदाभाऊ खोत यांनी म्हटले आहे. विशेष म्हणजे मला राज्यपाल करावे, अशी इच्छाही त्यांनी बोलून दाखवली.

पान २ वर

## मुख्यमंत्र्यांचा संदेश अन् आ.अभिमन्यू पवारांनी घेतली देशमुख कुटुंबीयांची भेट



**बीड । प्रतिनिधी**

**सरपंच हत्या प्रकरणाच्या तपासाबाबत देशमुख कुटुंबीयांकडून काही प्रश्न उपस्थित केले गेले. ते मुख्यमंत्र्यांच्या कानावर घातले जातील असे आमदार अभिमन्यू पवार यांनी सांगितले. मुख्यमंत्र्यांचा संदेश घेऊन आ. पवार आले असल्याचे म्हटले जात आहे.**

संतोष देशमुख प्रकरणात राज्य सरकार जे पाऊल उचलत आहे त्याची माहिती अभिमन्यू पवार यांनी दिली. त्यावर देशमुख कुटुंबीयांनी समाधान व्यक्त केले. पण काही बाबतीत देशमुख कुटुंबीयांना प्रश्न आहेत, त्याची माहिती मुख्यमंत्र्यांना दिली जाणार असल्याचे अभिमन्यू पवार यांनी सांगितले. अभिमन्यू पवार म्हणाले की, देशमुख कुटुंब यांच्या नव्या मागण्या आहेत त्यावर नक्कीच विचार केला जाईल. सरपंच देशमुख

पान २ वर

# अजितदादांकडून बीडकरांना विमान, रेल्वेचे स्वप्न; पण सत्यात कधी येणार?

## लवकरच विमानाचे टेक ऑफ होणार तर बीड-मुंबई रेल्वेही धावणार-अजित पवार

**बीड । प्रतिनिधी**

लवकरच विमानाचे टेक ऑफ लवकरच होणार तर बीड–मुंबई रेल्वेही धावणार असल्याचे सांगून जिल्ह्यातील वाळू गँग, राख गँग आणि भुखंड माफियांना सुतासारखे सरळ करणार असल्याचे उपमुख्यमंत्री व बीडचे पालकमंत्री अजित पवार यांनी म्हटले आहे. अजितदादांनी विमान आणि रेल्वेचे स्वप्न दाखवले खरे पण ते सत्यात कधी उतरणार याविषयी नागरीकांमध्ये चर्चा सुरु आहे. ते बीड जिल्हा दौऱ्यावर असताना बोलत होते. यावेळी त्यांनी राष्ट्रीय महामार्ग,

पान २ वर



### आ. प्रकाश सोळंकेकडून महत्वाच्या मुद्दयांवर प्रकाश

एमआयडीसी भागात पोलीस चौकी उभारणी करणे. नरेगा अंतर्गत जी अनावश्यक कामे झाली आहेत त्यातील कुशलची कामे प्रमाणात झालेली नाहीत. अनावश्यक मागणी केल्याने आज रोजी जी कामे आवश्यक आहेत ती करण्यासाठी अडचण निर्माण होत आहे. राष्ट्रीय महामार्ग क्र.३६१ एफ खरवंडी ते नवगण राजुरी रस्त्यावरील मौजे नवगण राजुरी, काटवटवाडी येथील संपादित प्रकरणात सुधारित निवाडा व निधी मागणी. खरवंडी–ब्रह्मनाथ येळंब–आर्वी–खालापुरी–नवगण राजुरी राष्ट्रीय महामार्ग क्र.३६१ एफ सुधारणा काम गेल्या सात वर्षापासून अपुर्ण आहे. बीड शहरातील जालना रोडे ते छत्रपती शिवाजी महाराज चौक नाली बांधकाम करण्याबाबत मागणी केली. मंत्री अजित पवारांनी त्यास मान्यता दिली. यावेळी आ. प्रकाश सोळंके यांनी माजलगावसह जिल्ह्यातील महत्वाचे प्रश्न अजित पवारांसमोर मांडले.

### आ.विजयसिंह पंडीत गेवराईच्या प्रश्नावर आक्रमक

गेवराईचे आ. विजयसिंह पंडित यांनी जिल्हास्तरीय आढावा बैठकीदरम्यान मतदारसंघातील विविध विषयांवर चर्चा केली. ग्रामीण भागातील वाडी, वस्ती, तांडे आदींना रस्ते मार्गाने जोडण्यासाठी शिव व पांदन रस्त्यांचा मोठा उपयोग होतो. नरेगा अंतर्गत माती काम झालेल्या सर्व रस्त्यांचा विकास करण्यासाठी त्यांना क्रमांक देवून रस्ते विकास आराखड्यात त्यांचा समावेश करण्यासाठी या रस्त्यांचा दर्जा उन्नत करण्यासाठी नवीन शासन निर्णय निर्गमित करण्याची मागणी अजितदादांकडे केली. या बाबत तातडीने कार्यवाही करण्याचे आश्वासन त्यांनी दिले. तसेच कल्याण–विशाखापट्टणम, खावंडी ते माजलगाव, सिरसदेवी या रस्त्यांचा प्रश्न मांडला. रस्त्यावरील खड्डे आठवडाभरात भुजले जातील असे आश्वासन यावेळी संबंधीत अधिकाऱ्याने दिले. आजच्या बैठकीत आमदार विजयसिंह पंडित यांनी गेवराई विधानसभा मतदारसंघातील विविध प्रश्न मार्गी लावले.



### आ. क्षीरसागरांनी बीड मतदारसंघातील मांडले महत्वाचे प्रश्न

याप्रसंगी बीड विधानसभा मतदारसंघाचे लोकप्रतिनिधी या नात्याने आ.संदीप क्षीरसागर यांनी बीड विधानसभा मतदारसंघातील महत्वाचे असलेले अनेक प्रश्न मंत्री महोदयांसमोर मांडले. एमआयडीसी भागात पोलीस चौकी उभारणी करणे. नरेगा अंतर्गत जी अनावश्यक कामे झाली आहेत त्यातील कुशलची कामे प्रमाणात झालेली नाहीत. अनावश्यक मागणी केल्याने आज रोजी जी कामे आवश्यक आहेत ती करण्यासाठी अडचण निर्माण होत आहे. राष्ट्रीय महामार्ग क्र.३६१ एफ खरवंडी ते नवगण राजुरी रस्त्यावरील मौजे नवगण राजुरी, काटवटवाडी येथील संपादित प्रकरणात सुधारित निवाडा व निधी मागणी. खरवंडी–ब्रह्मनाथ येळंब–आर्वी–खालापुरी–नवगण राजुरी राष्ट्रीय महामार्ग क्र.३६१ एफ ची सुधारणा करण्याबाबतचे काम गेल्या सात वर्षांपासून अपुर्ण आहे. बीड शहरातील जालना रोड ते छत्रपती शिवाजी महाराज चौक नाली बांधकाम करण्याबाबत मागणी केली. त्यास मा. मंत्री महोदयांनी सकारात्मकता दर्शविली. बीड नगर परिषद ने ओपन स्पेसच्या जागा अनियमितता करून बोगस वाटप केले आहेत. यासह महत्वाचे मुद्दे आ. क्षीरसागरांनी मांडले.






बीड–उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते आयुष्यमान भारत मिशनचे अध्यक्ष ओमप्रकाश शेटे यांचा सपत्नीक लोकशा रत्न पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला.

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.०२ एप्रिल २०२५

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| आवक | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ९७.०० क्विंटल | २,२६० | ३,००० | २,६०२ |
| ज्वारी/हायब्रिड:३८१.०० क्विंटल | १,७९० | ३,४९० | २,७९७ |
| मका/लोकल:३०.०० क्विंटल | २,१७५ | २,१७५ | २,१७५ |
| तूर : ८.०० क्विंटल | ६,६०० | ७,३०० | ७,०९२ |
| उडीद : १.०० क्विंटल | ५,४०० | ५,४०० | ५,४०० |
| बाजरी: ५१.५० क्विंटल | १,९०० | २,७९१ | २,४१३ |
| मुग :४.५० क्विंटल | ६,५०१ | ७,४५१ | ६,९७६ |
| सोयाबीन:१७४.०० क्विंटल | ४,४५० | ४,६०० | ४,५२८ |
| हरभरा: २२.०० क्विंटल | ५,४०० | ६,३०० | ५,६३२ |

### वक्फ विधेयक लोकसभेत सादर

नवी दिल्ली- लोकसभेत वक्फ विधेयक सादर करण्यात आले आहे. अल्पसंख्याक कल्याण मंत्री किरेन रिजिजू यांनी हे विधेयक मांडले. तसेच, हे विधेयक आणणे अत्यंत आवश्यक होते. हे विधेयक आणण्याची आवश्यकता का भासली? हेही त्यांनी सांगितले.

### जुने वाहन मोडीत काढल्यास नव्यासाठी १५ टक्के कर सवलत

मुंबई : स्वेच्छेने वाहन मोडीत (स्क्रॅप) काढणा-या वाहनधारकांना पुन्हा त्याचप्रकारचे नवीन वाहन खरेदी करताना १५ टक्के कर सवलत देण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. नोंदणीकृत

पान २ वर



अग्रलेख

# पायउतार होतीलही पण सध्या तरी मोदी एके मोदीच

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा उत्तराधिकारी कोण असेल आणि तो महाराष्ट्रातील असेल का, यावरील चर्चेला देवेंद्र फडणवीस यांच्या स्पष्टीकरणानंतर पूर्णविराम मिळायला हरकत नसावी. शिवसेना नेते खासदार संजय राऊत हे वेगवेगळ्या चर्चांना तोंड फोडण्यामध्ये वाक्बगार आहेत. पंतप्रधान मोदी यांच्या रेशीमबागेतील भेटीनंतर त्यांनी अशाच प्रकारे धागेदोरे जुळवून त्यात सर्वांना गुरफटून टाकण्याचा प्रयत्न केला. अर्थात हा गुंता अतिशय हळूवारपणे सोडवून फडणवीस यांनी आपला चाणाक्षपणा पुन्हा एकदा दाखवून दिला आहे. मागच्या काही दिवसांपासून शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचा भाजपाशी जुळवून घेण्याकडे कल वाढल्याचे दिसून येते. एकनाथ शिंदे आणि देवेंद्र फडणवीस यांच्यातील वाढती दरी व शिंदे गट तसेच भाजपातील शीतयुद्धाच्या पार्श्वभूमीवर ठाकरे सेनेकडून मोठ्या प्रमाणात साखरपेरणी केली जात आहे. मोदी यांचा उत्तराधिकारी महाराष्ट्रातील असेल, ही राऊत यांची भविष्यवाणी हा त्याचाच भाग. देवेंद्र फडणवीस हेच भविष्यातील पंतप्रधान असू शकतात, हेच राऊत यांना यातून सुचवायचे असावे. त्यातून फडणवीस यांच्याजवळ जाण्याचे त्यांचे प्रयत्न दिसतात. असे असले, तरी नेमके वास्तव काय, याचे राऊत यांनाही भान असावे. भाजपकडून पक्षातील नेत्यांसाठी ७५ वर्षे ही अलिखित डेडलाईन ठरविण्यात आली आहे. त्यानुसार अनेक नेत्यांना ७५ वर्षांनंतर निवृत्त केल्याचीही उदाहरणे सापडतात. हे बघता मोदी हेदेखील सप्टेंबरमध्ये निवृत्त होण्यासाठी नागपूर दौऱ्यावर आल्याच्या चर्चा पसरविण्यात आल्या. परंतु, त्यामध्ये काही तथ्य असायचे कारण नाही. पंच्याहत्तरीपर्यंतचा निकष भाजपाने ठेवला, हे नक्की. मात्र, मोदी यांची एकूणच कामाची पद्धत, त्यांची तंदुरुस्ती, अनेक तास काम करण्याची क्षमता व मुख्य म्हणजे सध्या तरी त्यांच्या नेतृत्वाला कोणताही पर्याय नसणे, या बाबी आगामी काळातही मोदी यांच्याकडेच देशाचे नेतृत्व राहील, याला बळकटी देतात. मुख्यमंत्री फडणवीस यांनी तर २०२९ नंतरही मोदी हेच देशाचे पंतप्रधान राहतील, असे स्पष्ट सांगूनच टाकले, यातच सर्व आले. देशाच्या राजकारणावर जवळपास सहा दशके काँग्रेसचा प्रभाव राहिला. भाजप व अन्य पक्षांची सरकारे आली. परंतु, कुठल्याही पक्षाचा या काळात देशावर एकछत्री अंमल राहिला नाही. मात्र, २०१४ मध्ये मोदी लाटेने सर्व समीकरणे उलटीपालटी केली. मोदींच्या नेतृत्वाखाली भाजपाने सत्ता प्राप्त केली आणि तेव्हापासून भाजपाची देशभर घोडदौड सुरूच असल्याचे दिसते. आज जवळपास अर्धा अधिक भारत भाजपाने पादाक्रांत केला आहे. २०१९ नंतर २०२४ च्या निवडणुकीतही यश मिळवत मोदी यांनी हॅट्ट्रिक नोंदवली असून, नवा विक्रमही प्रस्थापित केला आहे. या माध्यमातून देशातील प्रभावशाली पंतप्रधानांच्या यादीत मोदींनी स्थान मिळविल्याचे दिसून येते. मुख्य म्हणजे या दहा ते बारा वर्षांच्या काळात मोदी यांची लोकप्रियता दिवसेंदिवस वाढत असल्याचे दिसून येते. ही लोकप्रियता मोदी यांना अशी तशी मिळालेली नाही. त्यामागे निश्चितच त्यांची मेहनत आहे, हे नाकारता येत नाही. जनतेशी असलेला थेट संवाद, हे मोदी यांचे सर्वांत मोठे बलस्थान म्हणता येईल. मागच्या दोन टर्ममध्ये मोदी यांनी विविध योजना आणल्या. त्यातल्या किती यशस्वी झाल्या किंवा क्रांतिकारक ठरल्या, हे एक वेळ बाजूला ठेऊया. परंतु, या योजना ज्या पद्धतीने लोकांपर्यंत पोहोचविण्यात आल्या, त्याला तोड नसावी. मोदी यांची हीच खासियत ठरते. छोट्या छोट्या प्रकल्पाच्या किंवा वेगवेगळ्या योजनांच्या माध्यमातून ते ज्या प्रकारे लोकांशी कनेक्ट होतात, त्यातून एक वेगळीच वातावरणनिर्मिती होते. एकप्रकारे या साऱ्याला लोकचळवळीचे वा लोकसहभागाचे ऊप येते आणि तेच मोदी यांचे यश होय. विरोधक काहीही म्हणोत किंवा मीडियामध्ये काहीही छापून येवो. पण, आजही बहुतांश लोक मोदी यांच्या वाणीवर विश्वास ठेवतात. म्हणूनच 'मोदी है तो मुमकीन है,' याकडे आपण केवळ डायलाग म्हणून दुर्लक्ष करू शकत नाही. २०१४ पासून आजपर्यंत मोदी यांच्या कार्यकाळात बरेच निर्णय झाले. यातील काही धोरणांचा जनसामान्यांना फटकाही बसला. नोटबंदीसारख्या निर्णयांमुळे अर्थकारणावरही परिणाम झाला, हे खरेच. पण, अनेक चांगल्या गोष्टीही झाल्या. भ्रष्टाचार, पारदर्शकतेच्या पातळीवर पावले पडली. गुंडगिरीला लगाम घालण्याचे प्रयत्न झाले, अशी लोकभावना आहे. या साऱ्या बाबी मोदी यांना गुडबुकमध्ये नेतात. तशी मोदींनंतर कोण, याची चर्चा अधूनमधून सुरू असते. पर्याय म्हणून केंद्रीय मंत्री अमित शहा, उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ, नितीन गडकरी यांची नावे घेतली जातात. अलीकडच्या काळात देवेंद्र फडणवीस यांचे नावही भावी पंतप्रधान म्हणून घेतले जात आहे. किंबहुना, आज तरी मोदी यांना कोणताही पर्याय दिसत नाही. तसा भाजप हा धोरणी पक्ष आहे. त्यात रा. स्व. संघ हे तर भाजपचे मूळ. हे बघता मोदींच्या उत्तराधिकाऱ्याचा विचार संघ वा भाजपाच्या डोक्यात आत्तापासून सुरू असू शकतो, असे म्हणावयास जागा आहे. अर्थात जोवर मोदी यांचा जनमानसावर प्रभाव आहे. तोवर त्यांना कुणी हलवू शकत नाही, हीदेखील वस्तुस्थिती होय. त्यामुळे सध्या तरी त्यांच्या उत्तराधिकाऱ्याविषयी चर्चा करणे वायफळ ठरेल. हेच वातावरण कायम राहिले, तर मोदी आणखी एक टर्म घेतील व त्यानंतरच्या काळात स्वत:च आपला पर्याय जाहीर करू शकतील. एकूणच मोदी यांच्या धक्कातंत्री राजकारणाची शैली बघता भविष्यात ते स्वत:च नेतृत्वावरून पायउतार होण्याची शक्यता जास्त. तूर्तास मोदी एके मोदी, हेच खरे.

# दै.राज्य लोकतंत्रवर वर्धापनदिनानिमित्त शुभेच्छांचा वर्षाव!










# कन्हेरवाडी लघुसिंचन प्रकल्पाचे पाणी नदीपात्रात सोडण्याच्या मागणीसाठी नागरिक आक्रमक

## वेळेत मागणी पूर्ण न झाल्यास परळी-अंबाजोगाई महामार्गावर रस्ता रोको करणार -राजेभाऊ फड

**परळी वै.। पतिनिधी**

उन्हाची तीव्रता दिवसेंदिवस वाढत असून सूर्य आग ओकत आहे. यामुळे वातावरणातील तापमानात प्रचंड मोठ्या प्रमाणावर वाढ झाली असून जनावरांसाठी पाण्याची मोठी समस्या निर्माण होऊ लागलेली आहे. त्याचप्रमाणे काही भागातील जलस्त्रोत पातळीही खालावली असल्याने पाण्याचे दुर्भिक्ष निर्माण होत आहे. ही बाब लक्षात घेऊन कन्हेरवाडी लघु सिंचन प्रकल्पाचे पाणी नदीपात्रात सोडण्यात यावे अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते राजेभाऊ फड यांनी केली आहे. यापूर्वीही प्रशासनाला मागणी करण्यात आली असून त्यावर अद्याप कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही. यामुळे नागरिक संतप्त झाले असून दिनांक १० एप्रिल पर्यंत नदीपात्रात पाणी सोडले नाही तर ११ एप्रिल रोजी कन्हेरवाडी येथे गावातील सर्व ग्रामस्थ रस्ता रोको आंदोलन करतील असा तीव्र इशारा देण्यात आला आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते राजेभाऊ फड यांनी बीडचे जिल्हाधिकारी, गोदावरी पाटबंधारे विकास महामंडळाचे कार्यकारी अभियंता, जिल्हा पोलिस अधीक्षक, उपविभागीय अधिकारी तथा परळी ग्रामीण पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक यांना पत्र लिहिले असून त्याद्वारे आंदोलनाचा तीव्र इशारा देण्यात आला आहे. १० एप्रिल पर्यंत कान्हेरवाडी लघुसिंचन प्रकल्पाचे पाणी नदीपात्रात सोडले नाही तर ११ एप्रिल रोजी कन्हेरवाडी येथे परळी - अंबाजोगाई महामार्गावर ग्रामस्थांसह तीव्र स्वरूपाचे रस्ता रोको आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला आहे. सद्य स्थितीत निर्माण झालेली पाण्याची कमतरता आणि संभाव्य पाणीटंचाई लक्षात घेता कन्हेरवाडी लघुसिंचन प्रकल्पाचे पाणी नदीपात्रात सोडण्यात यावे. जेणेकरून जनावरांच्या पिण्याच्या पाण्याची समस्या दूर होईल



तसेच कन्हेरवाडी गाव, जिरेवाडी, बँक कॉलनी, समता नगर, जलालपूर, शंकर - पार्वती नगर, इंदपवाडी, ब्रह्मवाडी भागातील जलस्त्रोत पातळीत वाढ होऊन याचा नागरिकांना दिलासा मिळणार आहे. करिता आपण या मागणीचा गांभीर्यपूर्वक विचार करावा आणि योग्य ती प्रशासकीय कार्यवाही करून नदीपात्रात पाणी सोडावे अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते राजेभाऊ फड यांनी केली आहे. मागणी वेळेत पूर्ण न झाल्यास ग्रामस्थ तीव्र आंदोलन करण्याच्या पवित्र्यात असून याची सर्वस्वी जबाबदारी प्रशासनावर असेल असेही प्रशासनाला दिलेल्या पत्रात म्हटले आहे.

# नागडगाव मध्ये भरदिवसा घराचे कुलूप तोडून चोरी

## अज्ञात चोरट्यांनी साडे पाच लाखाचा मुद्देमाल केला लंपास

**माजलगाव । प्रतिनिधी**

**तालुक्यातील नागडगाव येथील माजलगाव आगारा मध्ये मेकॅनिक म्हणून कार्यरत असलेल्या परीवाहान मंडळाच्या कर्मचाऱ्यांच्या घराचे भरदिवसा कुलूप तोडून जबरी चोरी करण्यात आली आहे.ही घटना दि ३१ मार्च सोमवार रोजी दुपारी घडली आहे. दरम्यान अज्ञात चोरट्यांनी घरातील सोन्या-चांदीच्या दागिन्यासह जवळपास साडेपाच लाखाचा मुद्देमाल लंपास केला आहे.**

नागडगाव येथील लक्ष्मण आश्रुबा खामकर, वयः ५२ वर्षे, व्यवसायः कर्मचारी माजलगाव आगार मॅकेनिक,हे ड्युटीसाठी दि.३१ मार्च सोमवार रोजी माजलगाव आगारात आले होते.तर घरातील इतर मंडळी हे शेतावर कामासाठी गेले होते.यावेळी दुपारी ४:०० वाजता त्यांना फोनवरून माहिती मिळाली की, त्यांच्या घराचे कुलूप तोडून घरात चोरी झाली आहे. दरम्यान खामकर यांनी नागडगाव येथे जाऊन घराची पाहणी केली.असता घरातील कपाटातील सोन्या-चांदीचे दागिने सोन्याचे साखळी गंठण २.७ तोळे वजनाचे, सोन्याचे मिनी गंठण १.४ तोळे वजनाचे, सोन्याच्या ५ ग्रॅम चे तीन अंगठ्या १.५ तोळे वजनाचे, सोन्याचा तुकडा ०१ तोळे वजनाचे, सोन्याचे मिनी गंठण ५ ग्रॅम वजनाचे, सोन्याचे साखळी व ओम ५ ग्रॅम वजनाचे,सोन्याचे ओम ०५ नग एकुण ०५ ग्रॅम वजनाचे, सोन्याची ठुशी ०४ ग्रॅम वजनाचे, सोन्याच्या तीन बाळ्या ०३ ग्रॅम वजनाचे,सोन्याच्या कानातील पत्ते ०३ ग्रॅम वजनाचे, सोन्याचे कुडके व हुजुर ०२ ग्रॅम वजनाचे,सोन्याची अंगठी पिळदार ०३ ग्रॅम वजनाचे, सोन्याचे हुजुर ०१ ग्रॅम वजनाचे, सोन्याची बाळी ०१ ग्रॅम वजनाचे सोन्याचे हुजुर जोड ०१ ग्रॅम वजनाचे, सोन्याचे मनी ०१ ग्रॅम वजनाचे, चांदीचे हातातील ब्रासलेट ६० ग्रॅम वजनाचे,चांदीचे कडे ६० ग्रॅम वजनाचे,चांदीचे करंडा,चार वाटी पंचपाळ,दोन वाटी पंचपाळ ४० ग्रॅम वजनाचे, चांदीचे पायातील जोडवे ४० ग्रॅम वजनाचे,चांदीचे बाजुबंद,बांगड्या, कमरेचा छल्ला ४० ग्रॅम वजनाचे, चांदीचे जोडवे ४ नग १० ग्रॅम वजनाचे व रोख रक्कम १२००० पाचशे रुपये असा एकूण ५ लाख ३७ हजार रुपयाचा मुद्देमाल अज्ञात चोरट्यांनी लंपास केला.दरम्यान अज्ञात चोरट्या विरोधात लक्ष्मण आश्रुबा खामकर यांच्या फिर्यादी वरून गुन्हा दाखल करण्यात आला आहे.पुढील तपास पोलीस करत आहेत.

पान १ वरून...

## मुख्यमंत्र्यांचा संदेश अन् आ.अजित

यांची हत्या नसून ती माणुसकीला काळीमा फासणारी गोष्ट घडली आहे. उज्वल निकम यांच्यावर महाराष्ट्राचा विश्वास आहे. त्यांच्या तावडीतून आरोपी सुटणार नाहीत. सर्व आरोपींना फाशीची शिक्षा दिली जाईल.

**धनंजय देशमुखांनी घेतली अजित पवारांची भेट**

बीडच्या मस्साजोगचे दिवंगत सरपंच संतोष देशमुखांचे भाऊ धनंजय देशमुखांनी उपमुख्यमंत्री अजित पवारांची भेट घेतली. गेल्या तीन महिन्यातील प्रशासनाच्या गोंधळाबाबतची माहिती देशमुखांनी अजित पवारांनी दिली. यावेळी जिल्हा न्यायालयातील आरोपींच्या हाणामारी बाबत देखील चर्चा झाल्याची माहिती आहे. संतोष देशमुख प्रकरणाच्या तपासामध्ये अनेक उणिवा राहिल्या असून त्याचा पुन्हा एकदा तपास करण्यात यावा अशी मागमी धनंजय देशमुखांनी अजित पवारांकडे केली असल्याची माहिती आहे. तसेच या प्रकरणातील आरोपींना बीडसोडून इतरत्र हलवण्याच्या मागणीसह इतर मागण्यांचा मसुदा धनंजय देशमुखांनी अजितदादांना दिला.

---

## कर्जमाफी करत राहणे हा

इंदापूर येथील पत्रकार परिषदेत बोलताना खोत म्हणाले, गोपीचंद पडळकरांना मंत्री करा आणि मला राज्यापाल तरी करा, असे म्हटले. तसेच, आम्ही अनेक आंदोलन केली, लाठ्या-काट्या खाल्ल्या, पण कधीही भावनिकतेला हात घालून आंदोलने उभी केली नाहीत. ज्या शरद जोशींच्या विद्यापीठात आम्ही शिकलो, वाढलो त्यांनी आम्हाला शेतकऱ्यांच्या प्रश्नांवरती लढायला शिकवलं. शेतकऱ्यांचं दारिद्र्य घालवायचे असेल तर घटनेतील शेड्यूल ९ रद्द करावे लागेल. मूळ संविधान जनतेसमोर ठेवावे लागेल, असे सदाभाऊ खोत यांनी म्हटले. शेतकरी विरोधी जे कायदे आहेत ते काढून टाका. आजचा आवश्यक वस्तू कायदा, जमीन कमाल धारणा कायदा हे सर्व कायदे काढून टाका. एकदा का बंधने उठवली की शेतकऱ्यांच्या कंपन्या उभ्या राहतील. परंतु, हे कायदे रद्द केले तर शेतकऱ्यांच्या जमिनी संपुष्टात येतील, शेतकरी भूमिहीन होईल या भंपक कल्पना काही शेतकरी नेते मांडत आहेत ते पूर्णपणे चुकीच आहे, असेही सदाभाऊ खोत यांनी म्हटले.

---

## अजितदादांकडून बीडकरांना विमान,

जि.प. योजना, शिक्षण विभागाचे नवोपक्रम, इनक्युबेशन सेंटर, तसेच तारांगण, विद्युत वितरण, विविध विकास कामांचा आढावा जिल्हाधिकारी कार्यालयात घेतला. उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली विविध विकास कामांची तसेच शासकीय योजनांची जिल्हास्तरीय आढावा बैठक जिल्हाधिकारी कार्यालयात बुधवारी (दि.२) रोजी पार पडली. बीड जिल्हयांच्या सर्वांगिण विकासासाठी प्रशासन, लोकप्रतिनिधी व सर्व मिळून काम करू, विमानतळ, रेल्वे तसेच महत्वाच्या प्रलंबित कामांना गती देण्यासोबतच विकासकामासाठी निधी कमी पडू देणार नाही, असेही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज येथे सांगितले. यावेळी पर्यावरणमंत्री पंकजा मुंडे, आमदार सतिष चव्हाण, विक्रम काळे, प्रकाश सोळंके, सुरेश धस, संदीप क्षीरसागर, विजयसिंह पंडीत, उपमुख्यमंत्री यांचे सचिव राजेश देशमुख, विभागीय आयुक्त दिलीप गावडे, जिल्हाधिकारी अविनाश पाठक, जिल्हा पोलीस अधिक्षक नवनीत काँवत, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अदित्य जीवने यांच्यासह विविध विभागांचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते. यावेळी बोलताना अजित पवार म्हणाले, बीड जिल्हयांच्या सर्वांगिण विकासासाठी लोकप्रतिनिधी, प्रशासन व आपण सर्व नागरिक यांचा समन्वय महत्त्वाचा आहे. राज्य शासनाकडून जिल्हयातील विकासकामासाठी निधीची कमतरता पडू दिली जाणार नाही. अशी ग्वाही देतानाचा त्यांनी सांगितले की, अनेक वर्षापासून रेल्वेमार्गाच्या सुरू असलेल्या कामाला गती देण्यात येईल. विभागीय आयुक्त बीड रेल्वेबाबत दर महिन्याला आढावा घेतील. रेल्वे मार्गाच्या कामात कोणी अडथळा आणत असेल तर त्यांची गय केली जाणार नाही, अशा प्रकरणी थेट सरकारी कामात अडथळा आणल्याबाबतचे गुन्हे नोंदविण्याचे निर्देशही त्यांनी यावेळी दिले. विमानतळासाठी आवश्यक जागा बीड शहरापासून १४ किमी अंतरावर असलेल्या कामखेडा नजीक निश्चित करण्यात आली आहे. रेल्वे तसेच विमानतळ सेवा गतीने पुर्ण करण्यात येईल, विमातळाबाबतच्या भूसंपादनाची प्रक्रिया लवकरच सुरू करण्यात येईल. कोणत्याही परिस्थितीत या कामासाठी निधी कमी पडू दिला जाणार नाही, असेही त्यांनी सांगितले. आष्टी येथील वीज उपकेंद्राच्या कामाला गती देण्याचे निर्देश देत उपमुयमंत्री श्री. पवार म्हणाले, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून देशात २ कोटी घरकुल देण्याची योजना आहे, त्यात राज्यात २० लाख घरकुल देण्यात येणार आहेत, बीड जिल्हयात सद्यस्थितीत ८५ हजार घरकुलाचे काम सुरू आहे, येत्या कालावधीत ७५ हजार घरकुले पुर्ण करण्याचे उदिष्ट ठेवून काम करूया. दिवाळी नव्या घरकुलात या उपक्रमाची सुरूवात श्री. पवार यांच्या हस्ते करण्यात आली. शासकीय निधीची वाट न पाहता घरकूल उभारणाऱ्या १० कुटुंबाचा यावेळी श्री. पवार यांच्या हस्ते गौरव करण्यात आला. जिल्हा परिषदेच्या वतीने शिक्षक वर्गासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता प्रशिक्षण मिळावे यासाठी ३० लाख रूपयांची तरतूद अर्थसंकल्पात करण्यात आली आहे. यात गरज भासल्यास सीएसआर तसेच जिल्हा वार्षिक योजनेतून निधी देण्याचीही आपली तयारी असल्याचेही त्यांनी सांगितले. शालेय परिसर संरक्षक भिंत, शौचालय, अंगणवाडी तसेच शैक्षणिक विकासाला सर्वाच्च प्राधान्य देण्यात येणार असल्याचेही असल्याचे श्री. पवार म्हणाले. जिल्हयातील कायदा व सुव्यवस्थेचा आढावा घेत उपमुख्यमंत्री श्री. पवार म्हणाले, आपल्या जिल्हयातील कायदा व सुव्यवस्था चांगली यासाठी पोलीस प्रशासनासोबतच आपल्या प्रत्येकाची ती जबाबदारी आहे. पोलीस प्रशासनाला आवश्यक असलेला निधी तातडीने देण्यात येईल. पायाभूत सुविधा, वाहने तसेच पोलीस स्टेशनमध्ये आवश्यक त्या बाबींची तातडीची गरज पुर्ण करण्यासाठी १६ कोटी ३४ लाख रूपयांचा निधी देण्यात येत असल्याचेही श्री. पवार म्हणाले. जिल्हयात यापुर्वी देण्यात आलेल्या शस्त्र परवान्याचीही पुन्हा पडताळणी करण्यात यावी. गरज तपासूनच शस्त्र परवाना देण्यात यावा,असे निर्देश त्यांनी यंत्रणेला दिले. अंबाजोगाई येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाला येत्या वर्षात ५० वर्ष पुर्ण होत असल्याचे निमित्त साधून महत्त्वाच्या कामासाठी आवश्यक निधी शासन स्तरावरून देण्यात येईल. बीड सह लगत असलेल्या परभणी, लातूर व धाराशिव या चार जिल्हयातील रुग्णांची संख्या पाहता सर्व सुविधाही देण्यासाठी निधीची तरतूद करण्यात येणार असल्याचे उपमुख्यमंत्री श्री. पवार यांनी सांगितले. मराठवाड्यातील पहिले कौशल्यवर्धन केंद्रङ्गशहराच्या मध्यवर्ती भागात आय. टी. आय. च्या तीन एकर परिसरात कौशल्यवर्धन केंद्र उभारण्यात येणार आहे. टाटाच्या सहकार्याने हे केंद्र आकारास येईल. कंपनीतर्फे १६५.१० कोटी आणि एमआयडीसी कडून ३१.११ कोटी असे एकूण १९६.९८ कोटी खर्च करून याची उभारणी करण्यात येणार आहे. मराठवाड्यातील हे पहिले कौशल्यवर्धन केंद्र ठरणार आहे.

**आकर्षक असेल तारांगण**

एक उत्तम आणि अद्ययावत तारांगण उभारण्यात येणार आहे. यामध्ये सर्व जिल्हाभरातील शाळकरी मुलांना सहलीच्या माध्यमातून माहिती मिळावी हा या उभारणीचा हेतू आहे. बीड शहरात येणाऱ्या प्रत्येकासाठी एक उत्तम पर्यटन स्थळ देखील या तारांगणाच्या रूपाने उभे राहणार आहे. येथील आयटीआयच्या मोकळ्या जागेत २० कोटी रूपयांचा निधीतून तारांगण उभारण्याची योजना आहे. विद्यार्थ्यांनी बनविलेल्या विविध कलाकृती आणि जिल्हयातील प्रेक्षणीय स्थळांच्या प्रतिकृती ठेवण्याचे नियोजन आहे. जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी यावेळी जिल्हा प्रशासनाच्या वतीने नव्याने उभारण्यात येत असलेल्या विमानतळ, रेल्वे मार्गाची स्थिती तसेच सुरू असलेल्या विविध विकास कामांबाबत सादरीकरण केले.जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अदित्य जीवने, जिल्हा पोलीस अधीक्षक नववीन काँवत यांनीही आपल्या विभागाच्या वतीने सुरू असलेल्या कामाबाबत माहिती दिली. यावेळी विविध यंत्रणांचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

**एखाद्या समाजाची मने दुखावतील अशी वक्तव्य टाळा**

कार्यकर्ता मेळाव्यात बोलताना अजित पवार म्हणाले, आजकाल नेते मंडळी शहानिशा न करताच माध्यमांसमोर व्यक्त होत असून एखाद्या समाजाची मने दुखवणारी वक्तव्य टाळा, असा सल्ला त्यांनी बीड जिल्ह्यातील सर्वच नेत्यांना दिला. त्यामुळे अजितदादांचा रोख नेमका कोणाकडे होता? याविषयी तर्कवितर्क लावण्यात येत आहेत.

**फक्त चांगल्या प्रतिमेच्या कार्यकर्त्यांना सोबत घ्या**

गुन्हेगारी पार्श्वभुमीच्या कार्यकर्त्यांमुळे काय होते हे सर्वांनी पाहिली आहे, त्यामुळे कार्यकर्त्यांना सोबत घेताना तो चांगल्या प्रतिमेचा असला पाहिजे याची काळजी घ्या. तसेच मला हार, तुरे, टोप्या घालू नका. फक्त नमस्कार केला तरी चालेल. जेवढा मोठा हार तेवढेच काही तरी त्यामागे असतेच असेही पवार म्हणाले.

**जिल्हाधिकारी, एसपी, सीईओंना सुनावले**

बीड जिल्ह्यात कसलीही शिस्त पाळली जात नाही. हॅलिकॉप्टर लँड होताच कार्यकर्ते थेट तिथपर्यंत आल्याने अजितदादा अधिकाऱ्यांवर चांगलेच संतापले. काही तरी नियम असतात, ते यापुढे पाळले गेले पाहिजे असे सांगून जिल्हाधिकारी अविनाश पाठक, पोलिस अधिक्षक नवणीत काँवत आणि जि.प. मुख्य कार्यकारी अधिकारी आदित्य जिवणे यांना खडेबोल सुनावले. सर्वच शासकीय योजनांची आणि महत्वाच्या प्रकरणाची सविस्तर माहिती बैठकीत सांगता आली पाहिजे. यात कसलीही हलगर्जीपणा चालणार नसल्याचे सांगून या तीनही अधिकाऱ्यांना अजितदादांनी सुनावले.

---

## जुने वाहन मोडीत काढल्यास नव्यासाठी

वाहन निष्कासन केंद्रावर (आरव्हीएसएफ) परिवहन प्रकारातील वाहनांना नोंदणीपासून ८ वर्षांच्या आत वाहन स्वेच्छेने मोडीत काढल्यास तसेच परिवहनेतर प्रकारातील वाहनांना नोंदणीपासून १५ वर्षांच्या आत स्वेच्छेने वाहन मोडीत काढल्यास १० टक्क्यांची कर सवलत दिली जात होत होती. यापुढे एकरकमी कर लागू असणा-या परिवहन (ट्रान्सपोर्ट) तसेच परिवहनेतर वाहनांना कराच्या १५ टक्के सवलत दिली जाणार आहे. तर ज्या वाहनांना वार्षिक कर लागू आहे अशा परिवहन प्रकारातील वाहनाच्या नोंदणी दिनांकापासून पुढील ८ वर्षांपर्यंत तर परिवहनेतर प्रकारातील वाहनांसाठी पुढील १५ वर्षांपर्यंत वार्षिक करात १५ टक्के सवलत देण्यात येणार आहे. नोंदणीकृत केंद्रावर (आरव्हीएसएफ) वाहन मोडीत (स्क्रॅप केल्यानंतर ) काढल्यानंतर वाहनधारकास मिळालेले ठेव प्रमाणपत्र कर सवलतीसाठी पुढील दोन वर्षे वैध राहणार आहे. यात ज्या प्रकारचे म्हणजेच दुचाकी, तीन चाकी किंवा हलके मोटार वाहन मोडीत काढलेले असेल, त्याच प्रकारचे वाहन खरेदीनंतर नोंदणी करताना ही कर सवलत लागू होणार आहे. याबाबतची अधिसूचना जाहीर झाल्यापासून तीन वर्षांच्या आत असे वाहन स्वेच्छेने मोडीत (स्क्रॅप) काढल्यास ही कर सवलत मिळणार आहे.

राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
गुरुवार, दि. ३ एप्रिल २०२५


## एन.एम.एम.एस.परीक्षेत महाराणीचे १४ विद्यार्थी शिष्यवृत्तीसाठी पात्र

**वडवणी । प्रतिनिधी**

**वडवणी येथील, महाराणी ताराबाई माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे १४ विद्यार्थी शिष्यवृत्ती साठी पात्रता धारक ठरले या बद्दल संस्कार शिक्षण मंडळाचे संस्थापक कार्यवाह माजी आमदार केशवरावजी आंधळे साहेब यांनी या सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.**

गुणानुक्रमे पात्रता धारक पहिले तीन विद्यार्थी यामध्ये रेडेकर प्रांजल-११८,गुण घेऊन सर्वप्रथम आला .बोंगार्डे वेदिका निरंजन - ११२ गुण घेऊन दुसरी तर दिवटे संस्कृती सचिन - १०६ गुण घेऊन तिसरी आली. एनएमएमएस पात्रता धारक विद्यार्थी खालीलप्रमाणे बारटक्के सुमित-१०३, गुरसाळी गौरव - ९७, मुंडे गोरख नवनाथ -९४, रोकडे कुणाल -९१, घुमरे श्रीजा- ८६, झाडे श्रावणी-८६, वरवडे जान्हवी - ८२, बोगांर्डे सौजन्य - ७९, चौरे अक्षरा-७५, उजगरे कार्तिक -७४, कप्पे हर्षदा -५९ याप्रमाणे शिष्यवृत्ती साठी पात्र झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन शालेय समिती अध्यक्ष संजयभाऊ आंधळे, संचालक रणजीत भैय्या धस, संचालक अशोक भैय्या आंधळे, उपप्राचार्य अशोक मस्के, पर्यवेक्षक धाईतिडक पी.एम.,श्री डोईफोडे आर.एस.अर्थ विभाग प्रमुख, विभाग प्रमुख श्री चव्हाण बी.बी.,श्री.मंत्रे व्ही.एन. व त्याना मार्गदर्शन करणारी टिम यांनी अभिनंदन केले. प्राचार्य राऊत डी डी व सर्व शिक्षकवृंद यांनी शिष्यवृत्ती पात्रता धारक विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुढील भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

# दै.राज्य लोकतंत्रवर वर्धापनदिनानिमित्त शुभेच्छांचा वर्षाव!



# कर्जमाफी, हमीभावासह शेतकऱ्यांना पेन्शन द्या;शेकापची मागणी

**माजलगाव । प्रतिनिधी**

गेल्या अनेक वर्षापासून प्रलंबित असणारा, शेतकऱ्याच्या शेतीमालाला उत्पादन खर्चावर आधारित किफायतशिर हमी भावाचा प्रश्न प्रलंबित राहिल्यामुळे शेतकरी आणि शेती पूर्णतः तोट्यात गेले असून शेतकरी प्रचंड कर्जबाजारी झाला आहे, त्यातून हजारो शेतकऱ्यांच्या अत्महत्याचे आवाहन समोर असतांना, शेतकऱ्यांना कर्जमाफी दिली जात नाही, याउलट गेल्या ४०वर्षात आमदार, खासदार, मंत्री यांची मानधने दुपटी तिपटीवर गेली, त्यांच्या सुविधा आणि सुखसुईसाठी कोट्यावधी रुपयाचा शासन चुराडा करत आहे, याशिवाय प्रशासनातल्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या पगारी,मानधनात आणि भत्त्यात प्रचंड वाढ झाली असून मोठमोठ्या भांडवलदारांना शासनाकडून कोट्यावधी रुपयाची खैरात वाटप केली जात आहे, परंतु शासन शेतकऱ्यांना कर्जमाफी देत नाही ही बाब चिंताजनक असून शेती म्हणजे



आतबट्ट्याचा धंदा ही म्हण प्रचलित झाली आहे, शासन तरुणांना रोजगार द्यायला तयार नाही तर शेती तोट्यात जात असल्याने शेतकऱ्याचे मुलं देखील शेतीकडे वळायला तयार नाहीत ही बाब भविष्यासाठी चांगली नाही म्हणून शासनाने शेतकऱ्यांना उत्पादन खर्चावर आधारित किफायतशीर हमीभाव द्यावा, तसेच शेतकऱ्याच्या शेतमाला योग्य भाव न दिल्यामुळे शेतकऱ्यांच्या डोक्यावर प्रचंड कर्ज झाले असून ते सरसकट कर्ज माफ करण्यात यावे, याशिवाय वृद्ध शेतकऱ्यांना शासनाने प्रतिमा हा १५ हजार रुपये पेन्शन द्यावी, शेतकरी कामगार पक्षाचे लढाऊ कार्यकर्ते भाई सुमंत आण्णा उंबरे यांच्यावर २७ मार्च रोजी फेसबुकला पोष्ट केल्याच्या कारणावरून शिरसाळा पोलीस स्टेशनचे पीआय दहिफळे यांनी त्यांच्यावर व्देष भावनेतून खोटा गुन्हा दाखल केला असून त्यांना मानसिक त्रास देण्यासाठी बेकायदेशीर नोटीस दिली आहे, सिरसाळा पोलीस स्टेशनचे पि आय दहिफळे हे भ्रष्ट व हुकूमशाही प्रवृत्तीचे असुन त्यांनी दडपशाही सुरू केली असून त्यांची दडपशाही थांबवण्यासाठी त्यांच्या भ्रष्टाचाराची दडपशाहीची चौकशी करून त्यांना तात्काळ निलंबित करण्याची मागणी उपविभागीय अधिकारी माजलगाव यांना शेतकरी कामगार पक्षाचे नेते भाई अॅड.नारायण गोले पाटील, भाई मुंजा पांचाळ, भाई श्रीराम शेवाळे, भाई श्रीराम कोरडे, अॅड.सुधिर लिंबगावकर, कडाजी नावडकर यांनी दि.१ एफ्रील रोजी निवेदनाद्वारे केली आहे.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१९४८ : ओरिसा उच्च न्यायालयाची स्थापना
१९७३ : मार्टिन कूपर या मोटोरोला कंपनीतील संशोधकाने जगातील पहिला मोबाईल टेलिफोन कॉल बेल लॅब्जमधील डॉ. जोएल अँगेल याला केला.
१९७५ : बॉबी फिशरने अनातोली कार्पोव्ह विरुद्ध खेळण्यास नकार दिल्यामुळे अनातोली कार्पोव हा बुद्धिबळात जगज्जेता बनला.
१९८४ : भारताचा पहिला अवकाशयात्री राकेश वर्मा याची दोन रशियन अंतराळवीरांसह अंतराळप्रवासाला सुरुवात
२००० : आय. एन. एस. आदित्य हे नौकांना इंधन पुरवणारे संपूर्ण भारतीय बनावटीचे वेगवान जहाज नौदलाच्या ताफ्यात दाखल झाले.
२०१० : ऍपल कंपनी ने आयपॅड या टॅब्लेट संगणकाची पहिली आवृत्ती जाहीर केली.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१७८१ : स्वामीनारायण, भारतीय धर्मगुरू.
१८८२ : प्रसिध्द कादंबरीकार नाथमाधव.
१८८२ : द्वारकानाथ माधव पितळे उर्फ 'नाथमाधव' सामाजिक व ऐतिहासिक कादंबरीकार. त्यांच्या 'वीरधवल', 'रायक्लब' अथवा सोनेरी टोळी' या कादंबर्यांनी वाचकांना अक्षरशः वेड लावले होते. (मृत्यू: २१ जून १९२८)
१९०३ : कमलादेवी चट्टोपाध्याय मॅगसेसे पुरस्कार विजेत्या (१९६६) स्वातंत्र्यसैनिक व सामाजिक कार्यकर्त्या (मृत्यू: २९ आक्टोबर १९८८)
१९०४ : रामनाथ गोएंका 'इन्डियन एक्सप्रेस' वृत्तपत्रसमुहाचे संस्थापक, स्वातंत्र्य चळवळीतील नेते (मृत्यू: ५ आक्टोबर १९९१)
१९१४ : भारताचे पहिले फील्डमार्शल जनरल माणकेशा.
१९३० : जर्मन चॅन्सेलर हेल्मुट कोल्ह
१९१४ : फील्ड मार्शल सॅम माणेकशा (मृत्यू: २७ जून २००८)
१९३४ : जेन गुडॉल इंग्लिश प्राणिशास्त्रज्ञ
१९६२ : जयाप्रदा चित्रपट अभिनेत्री व संसद सदस्य
१९६५ : नाझिया हसन पाकिस्तानी पॉप गायिका (मृत्यू: १३ ऑगस्ट २०००)
१९७३ : भारतीय क्रिकेट खेळाडू निलेश कुलकर्णी यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१६८० : छत्रपती शिवाजी राजे भोसले (जन्म: १९ फेब्रुवारी १६३०)
१८९१ : एडवर्ड लूकास फ्रेन्च गणिती (जन्म: ४ एप्रिल १८४२)
१९८१ : पॅन अमेरिकन वर्ल्ड एरलाईन्स चे स्थापक जुआन त्रिप्प यांचे निधन.(जन्म: २७ जून १८९९)
१९८५ : डॉ. वासुदेव विष्णू मिराशी महामहोपाध्याय, संस्कृत विद्वान, प्राच्यविद्यासंशोधक (जन्म: १३ मार्च १८९३)
१९९८ : हरकिसन मेहता प्रसिद्ध गुजराती कादंबरीकार, 'चित्रलेखा प्रकाशन'चे मुख्य संपादक (जन्म:)
१९९८ : मेरी कार्टराइट इंग्लिश गणितज्ञ (जन्म: १७ डिसेंबर १९००)
२०१२ : भारतीय राजकारणी गोविंद नारायण यांचे निधन. (जन्म: ५ मे १९१६)

# बरसीम लागवड करा मिळवा आर्थिक फायदे



सध्याच्या घडीला डेअरी व्यवसाय ग्रामीण भागात शेतकऱ्यांसाठी मोठा व्यवसाय म्हणून समोर आला आहे. पशुपालन करणारे शेतकरी बहुतांशी जातिवंत दुधाळ गायी आणि म्हशी पाळण्यास प्राधान्य देतात. डेअरी व्यवसायातून शेतकऱ्यांना बऱ्यापैकी आर्थिक फायदा देखील होत आहे. मात्र, बऱ्याचदा जनावरांच्या खानपानावर विशेष लक्ष न दिल्यामुळे शेतकऱ्यांना आर्थिक नुकसान सोसावे लागते. त्यामुळे डेअरी व्यवसाय सुरू करण्याआधी जनावरांची देखभाल आणि आहाराबाबत शेतकऱ्यांना अधिक माहिती असणे आवश्यक असते. दुधाळ जनावरांना बरसीम गवत हे अतिशय लाभदायक आहे.

बरसीम हे गवत शेतकरी आणि पशुपालकांसाठी खूप महत्वाचे आहे. जनावरांच्या आहारात त्याचा समावेश केल्यास, दूध उत्पादनात वाढ होण्यास मदत होते. बरसीम गवत हे मेथीच्या भाजीप्रमाणे असलेले एक चारा पीक आहे. बरसीम नैसर्गिकरित्या उगवत नाही. परंतु जनावरांच्या चाऱ्यासाठी त्याची मोठ्या प्रमाणावर लागवड केली जाते. कडधान्य पीक म्हणूनही त्याची ओळख आहे. रब्बी हंगामात पाण्याची पुरेशी सोय असलेल्या भागात बरसीमची लागवड केली जाते. सुमारे दीड ते दोन महिन्यांनंतर बरसीमचे गवत कापणीला येते. हे गवत वेगाने वाढणारे गवत असून, ते ३५ दिवसांच्या अंतराने पाच ते सहा वेळा कापले जाऊ शकते. विशेष म्हणजे बरसीम पेरल्याने शेताची सुपीकताही वाढते.

कसे देतात जनावरांना बरसीम गवत : उन्हाळाच्या दिवसांमध्ये दुधाळ जनावरांची दूध उत्पादन क्षमता कमी होते. अशा परिस्थितीत जनावरांचे दूध उत्पादन वाढविण्यासाठी पुरेसा हिरवा चारा व धान्याच्या कणेची व्यवस्था करणे आवश्यक असते. बरसीम गवत जनावरांचे दूध वाढवण्यासाठी उपयुक्त आहे. ते कापून पेंढा मिसळल्याने फायदा होतो. प्रत्येक तीन किलो पेंढ्यामध्ये दीड किलो बरसीम गवत मिसळून दुधाळ जनावरांना खायला देणे चांगले असते. पौष्टिक गुणधर्मांनी समृद्ध असण्यासोबतच ते पचायलाही सोपे असते. दुधाळ जनावरांना दररोज बरसीम खायला दिल्याने त्यांचे दूध वाढते आणि त्यांचे आरोग्यही चांगले राहते.

आर्थिक स्थिती सुधारण्यास होते मदत : जर तुमच्याकडे पाण्याची सोय असेल तर लहान जागेतही तुम्ही बरसीम गवत लागवड करू शकतात. हे गवत वेगाने वाढण्यासोबतच जमिनीची सुपीकता वाढवण्यासाठी मदत करते. ग्रामीण भागात अनेक शेतकरी मोठ्या प्रमाणावर बरसीमची लागवड करतात. याशिवाय शहरांमध्येही राहणाऱ्या दुग्ध उत्पादकांना या गवताची विक्री केली जाते. बरसीम गवतामुळे जनावरांचे दूध उत्पादन वाढवण्याबरोबरच शेतकऱ्यांची आर्थिक स्थितीही सुधारण्यास मदत करतो.

# चवळी लागवड आणि प्रकार



महाराष्ट्रात चवळी मिश्र पीक म्हणून घेतळे जाते तर काही ठिकाणी पट्टे पध्दतीने लागवड केली जाते. अलिकडे मोठ्या शहरांच्या जवळपास भाजीच्या चवळीची ळागवड व्यापारीदृष्ट्या केली जाते. उन्हाळी पिकाची लागवड जानेवारी-मार्च तर खरीप हंगामात जून- जुलै महिन्यात करतात. तसेच बागायती पीक म्हणून हे पीक घेता येते.

चवळीचे तीन प्रकार आढळून येतात : १) लांब शेंगांची चवळी : यालाच बाली किंवा यार्डबीन म्हणतात, झाडे वेलीसारखी वाढतात. शेंगांची लांबी ३० ते ९० सें.मी. पर्यंत असते.२) गोल शेंगाची चवळी : या प्रकारात शेंगांची लांबी ७ ते १२ सें.मी. पर्यंत असते. बिया आकाराने लहान असतात.३) सर्वसाधारण चवळी : ही झाडे बुटकी ते मध्यम आकाराची असतात. काही जाती वेलीसारख्या वाढतात.लागवड : चवळी लागवडीपूर्वी जमीन नांगरून, कुळवून भुसभुशीत करावी व त्यात हेक्टरी १५ ते २० टन शेणखत मिसळावे. त्यानंतर सोयीनुसार वाफे किंवा सर्या पाडाव्यात व बी टाकावे. दोन ओळीतील अंतर ४५ ते ६० सें. मी. ठेवावे आणि विरळणी करून दोन रोपात २० ते ३० सें. मी. अंतर ठेवावे. हेक्टरी १५ ते २० किलो बी लागते.

सुधारित जाती : १) कोकण सफेद : ही जात ७५ ते ८० दिवसात येणारी असून तिला हिरबी गार पालवी व पांढर्या रंगाची फुले येतात. शेंगा खालच्या अर्धा भागापर्यंत लागतात. ही जात विषाणूजन्य रोगास प्रतिकारक आहे. या जातीपासून १४ क्विंटलपर्यंत हेक्टरी उत्पादन मिळते.२) कोकण सदाबहार : ही जात बुटकी असून लवकर तयार होते. शेंगा व पाने हिरव्या रंगाची असून लवकर येणारी उपयुक्त जात आहे. या जातीपासून १३ ते १४ क्विंटलपर्यंत उत्पादन मिळते. ३) पुसा-दो-फसली : ही जात उन्हाळी ब पाबसाळी या दोन्ही हंगामात घेता येते. झाडे झुडूपबजा वाढणारी असून शेंगाची लांबी १८ ते २० से.मी. पर्यंत असते. या जातीपासून ८० ते १०० क्विंटलपर्यंत उत्पादन मिळते. ४) अको गरीमा : या जातीच्या शेगांची लांबी २० ते २५ सें.मी. असून जाडी इतर चवळीच्या प्रचलित जातीच्या शेंगांपेक्षा जास्त असते. शेंगेत गराचे प्रमाण जास्त असल्याने भाजीसाठी ती जात उत्तम आहे. हेक्टरी १२० ते १५० क्विंटलपर्यंत उत्पादन मिळते. ५) पुसा कोमल : या जातीच्या शेगांची लांबी २० ते २२ सें.मी. पर्यंत असून, रंग हिरवा असतो. दाणा पांढरा, गोळ, लांबट आणि जाडा असल्याने उसळीसाठी ही जात चांगली आहे. शेंगांचे हेक्टरी उत्पादन १०० ते ११० क्विंटलपर्यंत मिळते.

६) पुसा फाल्गुनी : शेंगा गडद - हिरव्या रंगाच्या १२ ते १५ सें.मी. लांब असतात. लागवडीपासून ६० दिवसात शेंगा काढणीस तयार होतात. हेक्टरी ८० ते ९० क्विंटलपर्यंत उत्पादन मिळते. ७) पुसा बरसाती : ही जात खरीप हंगामासाठी उपयुक्त आहे. शेंगेची लांबी २० ते २५ सें.मी. पर्यंत असते. ही जात लागवडीपासून ४५ दिवसात काढणीला तयार होते. हेक्टरी ७५ ते ८० क्विंटलपर्यंत उत्पादन मिळते.

# उन्हाळ्यात फळझाडांची काळजी



सद्या उन्हाळ्याचे दिवस आहेत. या दिवसांत झाडांना पाण्याची गरज असताना पाणी मिळत नाही. यामुळे शेतकरी वेगवेगळ्याप्रकारे पाणी देण्याचा आणि झाडांभोवती ओल टिकवून ठेवण्याचा प्रयत्न करतात.

फळझाडामध्ये आच्छादनाचा वापर : आच्छादनाचा उपयोग केल्यास पावसाचा जमिनीवर पडण्याचा वेग मंदावतो आणि जमिनीत जास्तीत जास्त पाणी मुरले जाते. आच्छादनाच्या वापरामुळे जमिनीची धूप कमी होते. आच्छादनामुळे जमिनीतील पाण्याचा बाष्पीभवनाचा वेग मंदावतो आणि जमिनीत जास्त काळ टिकतो. तणांच्या वाढीस काही प्रमाणात आळा बसतो. जमिनीत योग्य तापमान राखण्यास मदत होते. जमिनीला भेगा पडण्याचे प्रमाण कमी होते अथवा जमिनीस भेगा पडण्याचा कालावधी लांबतो.

आच्छादनाच्या वापराने दिलेल्या खतांचा जास्त कार्यक्षमतेने उपयोग करून घेता येतो. उन्हाळी हंगामात दोन पाण्याच्या पाळ्यातील कालवधी वाढविता येतो. जमिनीत सेंद्रिय पदार्थांचे प्रमाण वाढून जमिनीचा पोत सुधारण्यास मदत होते. आच्छादनामुळे पिकांची वाढ चांगली होऊन उत्पादनातही वाढ होते.

खतांची फवारणी करणे : उन्हाळी हंगामात बाष्पीभवन व पर्णोत्सर्जनाचा वेग जास्त असल्यामुळे फळझाडांची पाने कोमजतात. पानांचे तापमान वाढते व पानातील पाण्याचे प्रमाण कमी होऊन पानातील अन्नांश तयार होण्याची क्रिया मंदावते.

अशा वेळी १ ते १.५ टक्के (१०० ते १५० ग्रॅम १० लिटर पाणी) पोटॅशियम नायट्रेट (३) आणि २ टक्के विद्राव्य डायअमोनियम फॉसपेट (२०० ग्रॅम १० लिटर पाणी) यांची २५-३० दिवसाच्या अंतराने फवारणी करावी. यामुळे पानातील अन्नांश तयार होण्याची क्रिया गतिमान होते व झाडे जमिनीतील ओलावा शोषण्यास सुरुवात करतात.

फळझाडांना बोर्डोपेस्ट लावणे : उन्हामुळे झाडातील पाण्याचे प्रमाण कमी झाल्यास झाडांच्या खोडावरील साली तडकण्याचे प्रमाण वाढू शकते. अशावेळी झाडांचे बुरशीजन्य व इतर रोगांपासून सरंक्षण करण्याच्या दृष्टीने खोडांना बोर्डोपेस्ट लावणे गरजेचे असते. सर्वसाधारणपणे १ ते २ मीटर उंची पर्यंत चुन्याची पेस्ट किंवा बोर्डो पेस्ट लावावी. बोर्डो पेस्ट लावण्याने सूर्यकिरण परावर्तीत होतात, खोडाचे तापमान कमी राहते, साल तडकत नाही.

# कांदा पिकावरील हा आहे सर्वात धोकादायक रोग

राज्यात मोठ्या प्रमाणात कांदा उत्पादन घेतले जाते. कांदा पिकाचे उत्पादन घेताना शेतकऱ्यांना अनेक औषध फवारण्या कराव्या लागतात. मात्र, कांदा पिकावरील रोग नियंत्रण करण्यात शेतकऱ्यांना अपेक्षित यश मिळत नाही. कांद्यावरील सर्व रोगांमध्ये पीळ रोग हा सर्वात धोकादायक रोग मानला जातो. कांदा लागवडीनंतरच्या पहिल्या टप्प्यात हा रोग आढळून येतो. ज्यामुळे लागवडीनंतर ऐन कांदा रोप पीक अवस्थेत पदार्पण करत असताना, कांद्यावर हा रोग दिसून येतो. परिणामी, एकरी उत्पादनात मोठी घट होण्यास हा रोग कारणीभूत ठरतो.

कांदा हे राज्यातील महत्त्वाचे पीक आहे. याशिवाय देशातील अनेक राज्यांमध्ये कांद्याचे उत्पादन घेतले जाते. प्रामुख्याने वर्षातून तीन वेळा कांदा लागवड केली जाते. कांदा हा शाकाहारी आणि मांसाहारी दोन्ही पदार्थांमध्ये वापरला जातो. कांद्यामध्ये अनेक पौष्टिक आणि औषधी गुणधर्म देखील आढळतात. त्यामुळे त्याची मागणी कायम आहे. उत्पादन थोडे कमी झाले की भाव वाढतात? मात्र, गेल्या दोन ते तीन वर्षांपासून प्रतिकूल हवामान आणि योग्य भाव न मिळत नसल्याने कांदा उत्पादक शेतकऱ्यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे.





पीळ रोगाची लक्षणे : कांद्यावरील पीळ रोगाची सुरुवातीची लक्षणे म्हणजे पानांवर पिवळे ठिपके पडतात. जे पानाच्या संपूर्ण भागावर पसरतात. या रोगाला ट्विस्टर किंवा स्प्रिंग असेही म्हणतात. कोलेटोट्रिचम बुरशीचे फिलामेंटस जमिनीत वर्षानुवर्षे आणि प्रभावित पिकांच्या अवशेषांमध्ये महिने टिकून राहू शकतात. ज्यामुळे याचा संपूर्ण कांदा पिकावर विपरीत परिणाम होऊ शकतो. कांदा पिकावरील पीळ रोगाचे मुख्य कारण म्हणजे थ्रिप्स कीटक आहेत. कांदा पिकावर थ्रीप्स किडीचा प्रादुर्भाव असल्यास, हे थ्रिप्स कांद्याच्या मऊ भागांना संक्रमित करतात आणि त्यानंतर त्या ठिकाणी बुरशीची वाढ सुरू होते. आणि कांद्याच्या पिकावर पीळ रोगाचा प्रादुर्भाव वाढतो.

पीळ रोग नियंत्रणासाठीचे उपाय : कांदा पिकासाठी पाण्याचा योग्य निचरा होणारी जमीन निवडावी. कांद्याचे प्रमाणित बियाणे वापरावे. ज्यामुळे रोग नियंत्रणास मदत होते. २ किंवा ३ वर्षांनी पिकांची आलटून पालटून लागवड करावी. ज्यामुळे जमिनीची उपयुक्तता टिकून राहते. लागवड करताना रोपांच्या योग्य अंतरासाठी काळजी घ्या. मातीची परिक्षणासह खतांचा योग्य वापर करावा. कांदा लागवड करताना रोपांमध्ये योग्य अंतर ठेवावे. रोगाच्या प्रादुर्भावाची लक्षणे ओळखून, प्रादुर्भाव झालेली झाडे उपटून नष्ट करावीत. शेतात प्रति एकर ८ ते १० पिवळे चिकट सापळे आणि ८ ते १० निळे चिकट सापळे लावावेत. नियमित तण नियंत्रण करावे, जेणेकरून रोगांचा प्रादुर्भाव होत नाही.

# स्वामी समर्थ अन्नछत्र सभागृहासाठी आ.नमिता मुंदडांच्या विकास निधीतुन १० लक्ष रुपये

## संसार जीवनात अध्यात्मिक अनुष्ठान महत्वाचे–नंदकिशोर मुंदडा

अंबाजोगाई। प्रतिनिधी

यशवंतराव चव्हाण चौकालगत असलेल्या शंकर नगर, मोरेवाडी येथील श्री स्वामी समर्थ मंदिरात अन्नछत्र सभागृह बांधकामासाठी केज विधानसभा मतदारसंघाच्या आ.सौ. नमिता अक्षय मुंदडा यांच्या विकासनिधीतुन सुमारे १० लक्ष रूपये मिळवुन घेवु असं सांगताना संसार जीवनात अध्यात्मिक मार्गाने गेले तर खर्या अर्थाने सुख तिथे मिळते. समाजातील दात्यांच्या योगदानातुन कोणताही यज्ञ पुर्ण करता येणे शक्य असल्याचे प्रतिपादन भाजपाचे जेष्ठ नेते नंदकिशोर मुंदडा यांनी केले तर भिऊ नकोस मी तुझ्या पाठीशी आहे ही निष्ठा श्री स्वामी समर्थावर ठेवुन मनोभाव सेवा केली तर तो भाविक भक्तांच्या पाठीमागे खंबीर उभा रहातो या शब्दांत भाजपाचे प्रदेश प्रवक्ते राम कुलकर्णी यांनी मनोगत व्यक्त केले.

शंकर नगर, मोरेवाडी येथील श्री स्वामी समर्थ मंदिरात प्रकट दिन उत्सव हजारो भाविक भक्तांच्या उपस्थितीत साजरा करण्यात आली. सकाळी समर्थांची भव्य मिरवणुक, दुपारी महाआरती व महाप्रसाद वाटप करण्यात आला. दरम्यान याच वेळी



मंदिराच्या समोर अन्नछत्रासाठी खरेदी केलेल्या जागेवर मान्यवरांच्या उपस्थितीत भुमीपुजनाचा कार्यक्रम संपन्न झाला. सुरूवातीला व्यासपीठावरील मान्यवरांचा मंदिर कमिटीच्या वतीने सत्कार झाल्यानंतर जेष्ठ सामाजिक नेते बन्सीआण्णा सिरसाट यांनी मनोगत व्यक्त करताना या सामाजिक कार्यासाठी आपण हवे तसे सहकार्य करू जिथे धार्मिक उद्दिष्ट असते तिथे आमची सेवा मनोभावे असते असं ते म्हणाले. शंकरराव उबाळे यांनी देखील मनोगतपर भाव व्यक्त करून सहकार्य बोलुन दाखवले. राम कुलकर्णी यांनी विचार मांडताना संसार जीवनात अध्यात्मिक शक्ती खर्या अर्थाने आनंदी जीवनाचा मार्ग असुन ज्या परमेश्वरासाठी आपण निवारा करू तोच आपल्याला निवारा आयुष्यासाठी देवु शकतो. अन्नछत्र बांधकामासाठी योगदान देण्याची संधी मिळणे खर्या अर्थाने भाग्य असुन भिऊ नकोस मी तुझ्या पाठीशी ही शक्ती दैवी चमत्कार असल्याचे त्यांनी सांगितले. जेष्ठ नेते नंदकिशोर मुंदडा यांनी सभागृहासाठी आमदाराच्या वतीने पुढाकार घेताना पहिल्या टप्यात दहा लक्ष रूपये मिळवुन देवु नंतर दुसर्या टप्यात दहा लक्ष रूपये पुन्हा देवुन एक सुसज्ज असं अन्नछत्र सभागृह बांधण्याचा संकल्प त्यांनी बोलुन दाखविला. माणुस सुखासाठी धडपडतो पण खरं सुख अध्यात्म,ज्ञान मार्गातुन मिळते जिथे दुःखाचा विसर झाल्याशिवाय रहात नाही. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मंदिराचे मुख्य सेवेकरी नारायण डांगे यांनी केले. व्यासपीठावर जिल्हा परिषद सदस्य बालासाहेब शेप, श्री काजगुंडे साहेब, सरपंच औदुंबर मोरे, अविनाश मोरे, कमलाकर आण्णा कोपले, श्री करनर साहेब, वसंत आबा मोरे, रामकृष्ण पवार, नागनाथ गित्ते, मारोती मोरे, रविकिरण मोरे, रणजित मोरे, महादेव सोमवंशी, कृष्णा भैय्या लोमटे, विशाल सोनवणे, विकास लामताणे, बाला पाथरकर, व्यंकट किर्दंत, मंदार काटे, अनंतराव आरसुडे, राम जाधव, राहुल कदम, जोशी सर, कुलकर्णी काका सर्व सेवेकरी मंडळ यांची उपस्थिती होती. संचलन गणेश मामा काळे यांनी केले. या धार्मिक सोहळ्याला मोठ्या प्रमाणावर भाविक भक्त व महिलांची विशेष उपस्थिती होती.

# साळींबा येथे लाडक्या कामधेनू गाईचं अनोखं डोहाळे जेवण!

## महिलांनी भरली ओटी अन् गोमातेसोबत खास फोटो सेशन



वडवणी प्रतिनिधी

वडवणी तालुक्यातील साळिंबा येथील शेतकरी तुकाराम बंन्सीधर जाधव व लताताई तुकाराम जाधव व त्यांच्या कुटुंबीयांनी तसेच गावातील सर्व महिलांनी एकत्र येऊन हिंदू धर्मात श्रेष्ठ असणाऱ्या गोमाता म्हणून ओळखल्या जाणाऱ्या कामधेनू गायीच्या डोहाळे पुरवित, महिलांनी भरली ओटी भरून पुजन करून गोमाते सोबत फोटो काढून अनोखे डोहाळे जेवणाचा सोहळा मारोती मंदिरा समोर काल रविवार रोजी पाडव्याच्या शुभमुहूर्ता आयोजित केला होता.

आई होणं ही महिलांच्या जीवनातील सुंदर अनुभव असतो. कुटुंबातील महिला गरोदर असेल तर संपूर्ण कुटुंबच तिचं गोड कौतुक करून मोठा खर्च करून डोहाळे जेवण सोहळा करत असतात. पण वडवणी तालुक्यातील साळींबा येथील तुकाराम जाधव व लताताई जाधव या शेतकऱ्याने आपल्या कामधेनू लाडक्या गायीचं डोहाळ जेवण सोहळा काल रविवार रोजी पाडव्याच्या शुभ मुहूर्तावर धूमधडाक्यात केला आहे. या अनोख्या डोहाळ जेवणा सोहळ्याची पंचक्रोशीत चर्चा आहे. गायीला आपण गोमाता म्हणतो त्याच गाईचे चक्क डोहाळे पुरवित डोहाळ जेवणाचा अनोखा सोहळा या शेतकरी कुटुंबाने केला. यानिमित्ताने सगळ्या गावाला त्यांनी आमंत्रित केले होते यामध्ये या सोहळ्याला गावातील सर्व महिलांनी एकत्र येऊन गायीला फुलांनी सजवून साडी,चोळीने ओटी भरून हळद कुंकू लावून पुजा करुन गोमाते सोबत फोटो काढून डोहाळे जेवण सोहळा अत्यंत उत्साहात साजरा करण्यात आला. शेतकरी तुकाराम जाधव, लताताई जाधव यांनी प्रतिक्रिया देताना सांगितली कि कामधेनू गायीला आम्ही उत्तम प्रकारे सांभाळले असुन. आमच्या सर्व घरादाराला तिचा चांगलाच लळा लागला आहे. आतापर्यंत तिने आम्हाला दुध भरपूर दिले. आमची गाय फारच गुणवान आहे आमच्या घरातील एक सदस्यच बनली आहे.

आमच्याकडे ती आल्यापासून आमच्या घरात लक्ष्मी नांदू लागली, अशी आमची श्रद्धा आहे. भारतीय संस्कृतीमध्ये गायीला देव मानलं आहे. तिचाही सन्मान व्हावा आणि तिच्या ऋणातून काही प्रमाणात उतराई होण्यासाठी म्हणून आम्ही हा अनोखा डोहाळे जेवण सोहळा कार्यक्रम आयोजित केला होता.

# गुढीपाडव्या निमित्त येणाऱ्या सर्व भाविकांस लाडू व झाड वाटप



अंबाजोगाई। प्रतिनिधी

अंबाजोगाईचे ग्रामदैवत माता श्री योगेश्वरी देवीच्या विश्वस्त मंडळाच्या वतीने नियमित महाप्रसादासोबतच सकाळपासूनच देवीच्या दर्शनासाठी येणाऱ्या सर्व भाविकांना शुद्ध तुपातील मोतीचुर लाडू तसेच झाडाचे एक रोप प्रसाद म्हणून दिवसभर देण्यात आले. मंदिराकडून मिळणारा हा अनोखा प्रसाद घेऊन भाविक देखील तृप्त होत असताना दिसून आले. मंडळाचा यामागील मुख्य उद्देश हा निसर्गाचा समतोल साधत हिंदू नवीन वर्ष गुढीपाडवा गोड व्हावा हाच असल्याचे मंदिर कमिटीच्या वतीने नमूद करण्यात येत होते . दिवसभरात १५०० लाडू व ७०० रोपांचे वितरण देवीच्या विश्वस्त मंडळाकडून भाविक भक्तांना करण्यात आले. लाडू व रोपांचे वाटप करतांना देवल कमिटीचे उपाध्यक्ष राजकिशोर मोदी, सचिव प्रा अशोक लोमटे, प्रवीण दामा तसेच अमोल लोमटे हे सदस्य उपस्थित होते.

श्री योगेश्वरी देवीचे नवीन विश्वस्त मंडळ स्थापन होऊन केवळ नऊ महिन्याचा अत्यल्प काळ लोटला आहे. या नऊ महिन्यात श्री योगेश्वरी देवी मंदिराचा कायापालट होतांना आढळून येत आहे. मोठ्या प्रमाणात मंदिराचे उत्पन्न देखील वाढल्याचे यावेळी विश्वस्त मंडळाचे सचिव प्रा. अशोक लोमटे यांनी सांगितले . श्री योगेश्वरी देवीची प्रथम पूजा करताना एक हजार रुपयांची देणगी पावती तसेच किमान तीन हजार रुपयांची पैठणी देवीला नेसवून करण्यात येत आहे. नंतर ती पैठणी भाविक भक्तांच्या मागणीनुसार अर्ध्या किमतीमध्ये ती पैठणी भक्तास दिल्या जाते. सकाळचा दैनंदिन प्रसाद व दुपारी १२ ते २ पर्यंत महाप्रसाद देखील देण्यात येत असल्याचे सचिव अशोक लोमटे यांनी बोलतांना नमूद केले आहे. मंदिर प्रशासनाचा दैनंदिन जमा खर्च वजा जाता आजच्या घडीला १ कोटी १२ लक्ष रुपयांची शिल्लक महाराष्ट्र ग्रामीण बँक व जनता सहकारी बँकेत मुदत ठेवीच्या रूपामध्ये सुरक्षित केली आहे. मंदिरातील सौर ऊर्जा प्रकल्प हा मागील अनेक दिवसांपासून नादुरुस्त अवस्थेत होता . त्यामुळे मंदिराचा वीजबिलापोटी वार्षिक पाच ते सहा लाख रुपये खर्च होत होता. मात्र नवीन विश्वस्त मंडळाने हा नादुरुस्त सौर ऊर्जा प्रकल्प दुरुस्त केल्याने वार्षिक वीजबिलाचा खर्च कमी होऊन ७०० युनिट वीज शिल्लक राहत असल्याचे मंदिर प्रशासनाकडून आमच्या प्रतिनिधीशी बोलतांना सांगितले. श्री योगेश्वरी देवीच्या दर्शनासाठी संपूर्ण महाराष्ट्रातुन भक्तगण येत असतो. आलेला प्रत्येक भक्त हा मंदिर प्रशासनाने केलेल्या सोयी सुविधा व सुलभ दर्शनामुळे समाधानी होताना आढळून येत आहे. येणाऱ्या भाविकांसाठी मंदिराच्या या सर्व सोयीसुविधाचे संपूर्ण श्रेय हे नवनिर्वाचित विश्वस्त मंडळाच्या सांघिक कामगिरी व जवाबदारी मुळेच शक्य झाले असल्याचे अंबाजोगाई शहरवासीय तथा भक्त गणांकडून बोलल्या जात आहे.

# पतंगे बंधू परत जिद्दीने यशोशिखरावर विराजमान होतील; शुभारंभाप्रसंगी मान्यवरांच्या भावना

वडवणी । प्रतिनिधी

वडवणी तालुक्यात नामांकित असलेल्या पतंगे ट्रेडर्सला काही दिवसांपूर्वी झालेल्या अग्नीतांडवाच्या दुर्घटनेला अवघे काही दिवसंच लोटले असतानाही प्रामाणिकपणा, मेहनत व नव्याने शून्यातून विश्व निर्माण करण्याची जिद्द बाळगणारे पतंगे बंधू यांनी परत एकदा त्याच उमेदीने वडवणी शहरातील बीड–परळी राज्य महामार्गावरील आंधळे पेट्रोल पंप शेजारी आपले पतंगे ट्रेडर्स या दालनाची नव्याने उभारणी करुन त्याचा शुभारंभ रविवारी गुढीपाडव्याच्या शुभ मुहूर्तावर करण्यात आला असून दरम्यान पतंगे बंधू परत एकदा त्याच जिद्दीने यशाच्या यशोशिखरावर विराजमान होतील अशा भावना याप्रसंगी भेटी देणाऱ्या विविध मान्यवरांनी व्यक्त केल्या.

वडवणी तालुक्यातील बांधकाम, फर्निचर व कलर यासह सर्व साहित्यांचे परिपूर्ण व नामांकित दालन असलेल्या पतंगे ट्रेडर्स या दुकानाला काही दिवसांपूर्वीच भयानक अशी अचानक आग लागल्याने या अग्नीतांडवात



अगदी होत्याचे नव्हते झाले. मागील २५ वर्षांपासून मोठ्या कष्टातून व प्रामाणिकपणे उभारलेल्या या वैभवाची राख होतांना सर्वांनी हताश होवून पाहिले. यात त्यांचे झालेले नुकसान कधीही भरुन न येण्याजोगे व न मोजण्याजोगे असेच आहे. मात्र असे असतांनाही, या दुर्घटनेने खचून न जाता, खचतील ते पतंगे कसले. याप्रमाणे या पतंगे परिवारातील कुटुंबप्रमुख विलासराव पतंगे, व त्यांची दोन्ही मुले विशाल पतंगे व विवेक पतंगे यांनी दुर्घटनेच्या दुसऱ्याच दिवशी परत एकदा रिस्टार्ट करण्याचा मनामध्ये संकल्प केला. आणि मागील २५ वर्षांपूर्वी ज्याप्रमाणे आपण शून्यातून सुरुवात केली अगदी त्याचप्रमाणे परत एकदा शून्यातून विश्व निर्मिती करण्याची इच्छाशक्ती मनाशी बाळगून वडवणी शहरातील बीड–परळी राज्य महामार्गावरील आंधळे यांच्या पेट्रोल पंप शेजारील गाळ्यांमध्ये आपले पतंगे ट्रेडर्स हे दालन स्थलांतर करुन त्याच ठिकाणी दिनांक ३० मार्च २०२५ रविवार रोजी गुढीपाडव्याच्या शुभ मुहूर्तावर याचा आपल्या आई–वडिलांच्या शुभहस्ते शुभारंभ केला. याप्रसंगी पतंगे परिवारावर निष्णात प्रेम करणारे त्यांचे स्नेहीजन, कुटुंबीय, आप्तेष्ट, मित्रपरिवार व व्यापारी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. या सर्वांनी त्यांच्या या पुन्हा एकदा नव्याने सुरुवात केलेल्या रिस्टार्टचे भरभरुन कौतुक केले व त्यांच्या जिद्द आणि चिकाटीला सलाम केला. हेच पतंगे बंधू परत एकदा जिद्दीने यशाच्या यशोशिखरावर विराजमान होतील अशा भावना याप्रसंगी भेटी देणाऱ्या विविध मान्यवरांनी व्यक्त केल्या. शेवटी सर्व उपस्थितांचे आभार पतंगे कुटुंबियांच्या वतीने मानण्यात आले.

# गुढीपाडव्यानिमित्त माळकरंजा शाळेत प्रवेश फेरीचे आयोजन

कळंब । प्रतिनिधी

आज हिंदू नववर्ष गुढी पाडवा या सणाच्या शुभ मुहूर्तावर जिल्हा परिषद आदर्श प्राथमिक शाळा माळकरंजा ता कळंब जिल्हा धाराशिव येथे शैक्षणिक वर्ष सन २०२५–२६ च्या प्रवेश पात्र विद्यार्थ्यांच्या घरोघरी जाऊन प्रवेशित करण्यात आले.शाळेतील सर्व मुलांची प्रभातफेरी गावातुन काढण्यात आली.आपली मुले शाळेत पाठवा, ज्ञानाचा दिवा घरोघरी लावा, गुढी पाडवा प्रवेश वाढवा,साक्षर जनता भुषण भारता, यांसारख्या घोषणांनी गाव परीसर दुमदुमून गेला.मुख्य कार्यकारी अधिकारी मैनक घोष, शिक्षणाधिकारी श्री अशोकराव पाटील आणि गट शिक्षणाधिकारी श्री धर्मराज काळमाते,विस्ताराधिकारी श्रीमती मैनाबाई मुळे मॅडम यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत या फेरीचे आयोजन करण्यात आले.यावेळी गावातील प्रवेश पात्र नऊ विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात आला मुलांना पुष्पहार, साखरेचा हार घालून औक्षण करून सन्मानित करण्यात आले.या प्रसंगी शाळेचे मुख्याध्यापक तथा राष्ट्रीय ओबीसी बहुजन शिक्षक महासंघाचे राज्य सरचिटणीस संतोष भोजने, उपक्रम शील शिक्षक श्री हनुमंत रामभाऊ घाडगे , श्रीमती भारती सूर्यवंशी, मुख्यमंत्री युवा प्रशिक्षणार्थी कुमारी मंजुश्री कराड, अंगणवाडी ताई शालिनी सोनावणे यांनी विद्यार्थ्यांना सन्मानित केले.

# पोलिसांना मोटरसायकल सापडली मात्र आरोपीचा शोध लागेना

जालना । प्रतिनिधी

बदनापुर रस्त्याने पायी जाणाऱ्या. महिलेच्या गब्यातील मंगळसुत्र हिरकावुन धुमस्टाईल पळ काढण्याचा प्रयत्नात चोरट्यांच्या हाती महिलेचा बुरखा लागल्याने त्यांनी १० फुट फरफटत नेले, याप्रकरणी पोलिसांना मोटरसायकल सापडली परंतु पोलिसांना आरोपी सापडत नाही हे विशेष. घटनेनंतर लगेच आरोपी त्यानंतर ते दोघे पसार झाले असून, महिला गंभीर जखमी झाली आहे.या संदर्भात पोलीस सुत्रांनी दिलेली अधिक माहिती अशी की, बदनापुर येधीत शबाना सय्द रफिक (रा. हुसेन नगर)२ वाजेच्या सुमारासत इंदयी खरेदी करण्यासाठी घराबाहेर पडल्या होत्या. त्या रस्त्याने पायी जात असताना साईनाथ हॉस्पीटल समोर एका काळ्या रंगाधी यामहा । दुचाकी त्यांचयाजयळ आली आणि.पाठी मागे बसलेल्या व्यक्तीने शबाना सय्यद यांच्या गळ्यातील १० ग्रेम सोन्याच मणिमंगळसुत्र हिस्कावण्या चा प्रयत्न केला.मात्र यावेळी शबाना सय्यद यांचा बुरखा यांच्या हाती लागल्याने त्यांनी सुमारे १० फुटापर्यत त्याना फरफटत नेले, यावेळी झालेल्या झटापटीत शबाना यांचे मंगळसुत्र तुटले असलेतरी कैवळ दोरा चोरटयांच्या हाती लागला. हा संपूर्ण प्रकार पिडीत महिलेच्या मुलाने पाहिला आणि दुचाकीचा.एम एच २० एफझेड–७५८१) नोद करून घेतला. घटनेनंतर तात्काळ नातेवाईकांना माहिती देण्यात आली असता त्यांनी जखमी शबाना सय्यद यांना उपचारासाठी रुग्णालयात हलविले, यप्रकरणी शबाना सय्यद रफीक यांच्या फिर्यादि वरून चोरट्याच्यांविरूध दोघा मंगळसुत्र चोरा विरूध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेमुळे बदनापुर पस्सिरात रस्त्यावरुन दिवसा फिरण्याबाबत महिलामध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले आहे. फुटेज कॅमेरे चेक केल्यास आरोपी पण सापडतील अशी चर्चा सुरू आहे.

मुस्लिम धर्माचा पवित्र रमाझन महिना, रमजान ईद निमित्त ईदगाह मैदान येथे मुस्लिम समाज बांधवानी सामूहिक नमाज पठाण करून एकमेकांना ईद च्या शुभेच्छा दिल्या. शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे ) पक्षाचे जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांनी उपस्थित राहुन सर्व मुस्लिम बांधवाना शुभेच्छा दिल्या. त्या वेळी त्यांच्या समवेत राजाभाऊ माहुवाले, संदीप उबाळे, रवी वाघमारे, दिलीप नाना पवार सह आदी शिवसैनिक पदाधीकारी उपस्थित होते.


### जाहीर प्रगटन

**मा. विशाखा बी. पाटील ६ वे सह. दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज नंबर ५७२/२०२५**

**जानबी अब्बास शेख**

**विरूध्द्र निरंक**

**अर्जदार १ जानबी अब्बास शेख वय ८१ वर्षे, धंदाः घरकाम, रा. सुर्डी, पो. केसापुरी परभणी ता. जि. बीड. २. चांदबी मिया शेख, वय ६१ वर्षे धंदा घरकाम, रा.गुंज, ता. घनसांगवी, जि. जालना. ३ अशाबी शैकताली सय्यद, वयः ७० वर्षे, धंदा घरकाम, रा.नवु प्रताप नगर, सुरत, ता. जि. सुरत. ४ शौकत दादाभाई, उर्फ दादुभाई शेख, वयः ४० वर्षे, धंदाः घरकाम, रा. सुर्डी, पो. केसापुरी परभणी ता. जि. बीड.**

गैरअर्जदार

विरुध्द निरंक

मागणी: वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत. वरील अर्जदार यांनी या न्यायालयात मयत शेख नजरबी शेख दादुभाई, यांचे वारस असल्या बाबतचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. ज्याअर्थी –शेख नजरबी शेख दादुभाई, यांचा मृत्यु दि. ०१/०१/२०१३ रोजी राहत्या घरी सुर्डी, पो. केसापुरी परभणी, ता. जि. बीड येथे मयत झालेल्या असून अर्जदार मयत शेख नजरबी शेख दादुभाई, यांचे नातेवाईक आहे. वरील अर्जदार यांना शासकीय व खाजगी कामासाठी वारस प्रमाणपत्र याची आवश्यकता आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहू अर्जदार सदरहू मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत, त्यांनी हया कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि हया लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार हयांचे हक्काबदद्‌ल लागलीच पुरावा घेऊन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास, त्यांना सदरहू मयत शेख नजरबी शेख दादुभाई, रा. सुर्डी, पो. केसापुरी परभणी ता. जि. बीड. यांचे वारस असल्या बाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याचीनोंद घ्यावी.

**आज दिनांक ०१ माहे एप्रिल सन २०२५ रोजी माझ्या सहिने व न्यायालयाचे शिक्याने दिले. सदर प्रकरणाची पुढील तारीख दि. ०७/०५/२०२५ आहे.**

आदेशावरून

स्वाक्षरित (शिक्का) स्वाक्षरित

**क लिपीक** **अधिक्षक**

दिवाणी न्यायालय व. स्तर बीड



### जाहीर प्रगटन

**मा. के. सी. माने सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांच्या न्यायालयात, बीड, ता.जि. बीड**

**किरकोळ दिवाणी अर्ज कमांक ५६७/२०२५**

CNR No. MHBI020000011282024

**(मार्फत ॲड एस. आर. पाखरे)**

**प्रकाश रामराव तुपे व इत्तर २ वि. निरंक**

अर्जदार :– १. प्रकाश रामराव तुपे, वय ७५ वर्ष, धंदा–शेती, रा. पिंपळवाडी, ता. जि. बीड, २. सुरेश पि. प्रकाश तुपे, वय ५० वर्ष, धंदा–शेती, रा. पिंपळवाडी ता. जि. बीड, ३. रमेश पि. प्रकाश तुपे, वय ४६ वर्ष, धंदा–शेती, रा. पिंपळवाडी ता. जि. बीड

विरुध्द निरंक

मागणी अर्ज :– बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ नुसार मयताचे वारस म्हणुन मिळणे बाबत. वरील अर्जदार क. १ ते ३ यांनी या न्यायालयात मयत गांधारीबाई प्रकाश तुपे यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज केला आहे. ज्याअर्थी मयत गांधारीबाई प्रकाश तुपे यांचा मृत्यु दिनांक १९/०६/२०१४ रोजी राहते घरी पिंपळवाडी येथे त्यांचा मृत्यु झाला. वरील अर्जदार यांनी या न्यायालयात वरील मयताचे वारस असल्या बाबत वारसाचे प्रमाणपत्र मिळणे बाबत अर्ज दाखल केला आहे. अर्जदार क्र.१ हे मयाताची पती असून अर्जदार क्र. २ व ३ हे मयताचे मुले आहेत. वरील अर्जदार शिवाय मयताचे इतर कोणीही कायदेशिर वारस नाहीत. मयत गांधारीबाई प्रकाश तुपे यांचे मृत्युनंतर वरील अर्जदार यांना शासकीय व निमशासकीय कामाकरीत व ईतर कार्यालयीन उपयोगा करीता सदर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरील अर्जदार हे सदरहू मयतांचे वारस नाहीत असे कोणास समजावयाचे असेल तर त्यांनी हे प्रगटन दैनिक 'लोकतंत्र' मध्ये प्रसिध्द झाल्यापासुन तीस दिवसांच्या आत या न्यायालयात हजर होवुन आपली हरकत कळवावी. जर मुदतीत कोणीही हरकत न कळविल्यास हे न्यायालय अर्जदारांचे हक्कांत त्यांचा हक्काबाबतचा पुरावा घेवुन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना मयतांचे वारस असल्याबाबतचे वारस प्रमाणपत्र दिले जाईल याची सर्वांनी नोंद घ्यावी.

प्रकरणातील पुढील तारीख ०२/०५/२०२५

आज दिनांक ०२ माहे एप्रिल २०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

आदेशावरून

स्वाक्षरित (शिक्का) स्वाक्षरित

**क लिपीक** **अधिक्षक**

दिवाणी न्यायालय व. स्तर बीड


# संघर्षसुर्य पुस्तक प्रत्येकाच्या जीवनासाठी उपयुक्त –ह.भ.प. शामसुंदर महाराज सोन्नर

अंबाजोगाई । प्रतिनिधी

संघर्षसूर्य (संघर्षातून आत्मविश्वास)या पुस्तकाचा प्रकाशन सोहळा कै.विलासराव देशमुख सभागृहात मोठया थाटात माटात संपन्न झाला कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जेष्ठ पत्रकार,किर्तनकार, कवी ह.भ.प.शामसुंदर महाराज सोन्नर होते.उद्धाटक म्हणून उप विभागीय अधिकारी दिपक वजाळे तर प्रमुख पाहुणे मा.डॉ.प्रा.डी.डी.पवार कुलसचिव,स्वा.रा.ती.मराठवाडा विद्यापीठ, नांदेड तसेच दगडू लोमटे(प्रसिद्ध लेखक, साहित्यिक)मा.डॉ.प्रा. मुकूंद राजपंखे (इंग्रजी विभाग प्रमुख, य.च.म. अंबाजोगाई) मा.डॉ.प्रा.रामकृष्ण धायगुडे मा. सहसंचालक,नांदेड विभाग तसेच मा.डॉ.प्रा.व्ही.आर. पाटील (प्राचार्य, कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय चिखलदरा)मा.डॉ.प्रा. हनुमंत सौदागर साहित्यिक,केज ॲड. राजेंद्रप्रसाद धायगुडे आदी मान्यवर उपस्थित होते

यावेळी बोलताना दिपक वजाळे म्हणाले की लेखकाने हे लिहिलेले संघर्ष–सूर्य हे पुस्तक जिद्द,चिकाटी,मेहनत करायला शिकवणारे पुस्तक आहे, तर प्रमुख पाहुणे ज्येष्ठ साहित्यिक दगडू लोमटे म्हणाले की विद्यार्थ्यांना यशस्वी होण्यासाठी अत्यंत उपयुक्त



असे हे संघर्ष सूर्य पुस्तक आहे डॉ.प्रा.मुकुंद राजपंखे म्हणाले की संघर्ष–सूर्य हे पुस्तक युवकांना लढायला आणि घडायला लावणारे पुस्तक आहे.

डॉ.प्रा.पवार म्हणाले की हे पुस्तक नातेसंबंध कसे जपायचे हे शिकवणारे पुस्तक आहे. प्राचार्य डॉ.प्रा.पाटील म्हणाले की, कुठल्याही परिस्थितीमध्ये रडत न बसता लढायला शिकवणारे हे पुस्तक आहे, डॉ.प्रा.रामकृष्ण धायगुडे म्हणाले की हे पुस्तक प्रत्येक विद्यार्थ्यांनी,तरुणाने वाचण्यास योग्य आहे. प्रमुख पाहुणे डॉ.प्रा.हनुमंत सौदागर म्हणाले की संघर्ष–सूर्य हे पुस्तक केवळ सवयींची जादू काय असते एवढेच शिकवणारे नसून हे पुस्तक म्हणजे जीवनाची घटना आहे, अध्यक्षीय समारोपात श्यामसुंदर महाराज सोन्नर म्हणाले की, लेखकाने लिहिलेले पुस्तक हे प्रत्येकाला जीवन उपयोगी पुस्तक आहे प्रास्तविकात ऍड. राजेंद्रप्रसाद धायगुडे यांनी पुस्तक लिहण्या मागचा उद्देश सांगून जीवनात आलेले अनुभव संघर्षसुर्य मधून सांगितला आहे असे सांगितले. यावेळी संजय गिरी,लोंढाळ,मंत्री,मसने यांचा गौरव करण्यात आला. पाहुण्यांचे स्वागत तात्या –आभई प्रतिष्ठानच्या वतीने करण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी नवनाथ चौरे,गोपाळ कांदे,रावसाहेब करनर,तुळजीराम सोन्नर,सुनील साखरे,केशव भताने,डॉ.उमाकांत गाढवे, ॲड.अविनाश धायगुडे ,ॲड.ओम लोंढाळ ,दयानंद गडदे ऍड.पुष्पा धायगुडे, देवनंदा सोन्नर, अप्पा देवकते,वाघा मडके,प्रशांत हेडे,अर्जुन चौरे,श्रीकांत देवकते, किरण सोन्नर,विजय देवकते,प्रशांत धायगुडे व इतरांनी परिश्रम घेतले.

राज्य लोकतंत्र
गुरुवार, दि.०३ एप्रिल २०२५


# ६० वर्षांवरील नोंदणीकृत बांधकाम कामगारांना पेन्शन लागू

## लाल बावटा बांधकाम कामगार संघटनेच्या आंदोलनास व मागणीस यश

**वडवणी । प्रतिनिधी**

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ विविध कल्याणकारी योजना राबवत आहे. याध्ये वय १८ ते ६० वर्षे वयोगटातील बांधकाम कामगारांना मंडळाकडे नोंदीत करुन घेतले जाते व त्यांना विविध योजनांचा लाभ देण्यात येतो. वयाची ६० वर्षे पूर्ण केल्यानंतर बांधकाम कामगार मंडळाकडे नोंदणी होऊ शकत नाही व त्यांना कोणताही लाभ मिळत नाही. ६० वर्षे पूर्ण झालेल्या बांधकाम कामगारांना त्याच जिवन सुखकर होण्यासाठी पेन्शन योजना गरजेची होती कारण वृद्धपना मुळे बांधकाम काम सारख कष्टाच ते काम करू शकत नाही आणि जगण्याच्या गरजा ते पूर्ण करू शकत नाही कारण हातावर पोट असतं आणि वयोमानामुळे काम होत नाही आणि मंडळाकडे नोंदणी नूतनीकरण होत नाही अशा वेळी ज्या बांधकाम कामगारांच ६० वर्षे पूर्ण झालेल आहे अशा बांधकाम कामगार पेन्शन म्हणजे निवृत्ती वेतन मिळावे अशी मागणी गेली १० वर्षे सातत्याने आंदोलने व पाठपुरावा करून महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार फेडरेशन सिटू व लाल बावटा बांधकामगार संघटना अनेक वर्षापासून या प्रश्नाला घेऊन सातत्याने आंदोलने मोर्चे निदर्शने व निवेदन देऊन ही योजना मंजूर व्हावी म्हणून कामगार मंत्री मंडळाचे सचिव यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा करत होती व मागील तीन वर्षापासून आग्रहाने पाठपुरावा करून १० ऑक्टोबर २०२२, ९ ऑगस्ट २०२३, ११ सप्टेंबर २०२३ रोजी मोर्चे काढून कामगार मंत्री सुरेश खाडे यांच्यासोबत मंत्रात झालेल्या बैठकीत पेन्शनच्या मागणीवर सकारात्मक चर्चा होऊन मंत्री सरकारात्मक होते परंतु त्यावर कोणताच निर्णय घेतलेला नाही. त्यामुळे १२ ऑगस्ट २०२४ ला महाराष्ट्रभर सिटू ने आंदोलन केले व तसेच २४ सप्टेंबर २०२४ रोजी कामगार मंत्री सुरेश खाडे यांच्या कार्यालयावर ३० हजार बांधकाम कामगारांचा मोर्चा काढण्यात आला.व असा वेळोवेळी निवेदने, बैठकीत पेन्शनच्या मागणी जोरदार मांडली त्याची फलश्रुती आज बांधकाम कामगारांना पेन्शन योजना लागू करण्यात आली . त्यामुळे बांधकाम कामगारांत आनंदच वातावरण आहे. या लढ्यात हाजारो बांधकाम कामगार सहभागी होते त्यांच अभिनंदन व. लाल बावटा संघटना करतो .व हि पेन्शन योजना जो पर्यंत कार्यान्वित होत नाही तो पर्यंत संघटना लढत राहणार आहे. व या योजनेत



मंडळाकडे नोंदीत असलेल्या व वयाची ६० वर्ष केलेल्या बांधकाम कामगारांना दरवर्षी १२००० रुपये इतके निवृत्तीवेतन देण्यात येईल. यामध्ये १० वर्षे नोंदणी कालावधी पूर्ण झाल्यानंतर त्यांना ५० टक्केच्या मर्यादेत प्रतिवर्षी ६००० रुपये, १५ वर्षे नोंदणी कालावधी पूर्ण झाल्यानंतर ७५ टक्केच्या मर्यादेत प्रतिवर्षी ९००० रुपये आणि २० वर्षे नोंदणी कालावधी पूर्ण झाल्यानंतर प्रतिवर्षी १२००० रुपये इतके निवृत्तीवेतन देण्यात येईल.अशा प्रकारची हि पेन्शन योजना बांधकाम कामगारांसाठी लागू करण्यात आली आहे हि लागू होण्यासाठी लाल बावटा बांधकाम कामगार संघटनचे व सिटू चे नेते कॉल.डि.एल.कराड,कॉ.एम .एच.शेख

कॉ.भरमा कांबळे कॉल.शिवाजी मुकदुम, कॉ.ओम पुरी ,कॉ.बी.जी.खाडे यांनी परिश्रम घेतले. व या सर्वांनी कामगार मंत्री आकाश फुंडकर यांचे आभार व्यक्त केले.

# चुकीची कागदपत्रे देऊन मिळविला वसुली अधिकार

## आष्टी येथील पतसंस्थेचा प्रताप; जिल्हा उपनिबंधक बीड येणार अडचणीत

**आष्टी । प्रतिनिधी**

येथील आष्टी नागरी सहकारी पतसंस्थेने चुकीची माहिती देवुन प्राप्त केलेले वसुली अधिकाऱ्याचे १५६ चे अधिकर पतसंस्थेच्या वसुली अधिकाऱ्याने आपली व सहकार विभागाची फसवणुक करत मा.सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था महाराष्ट्र राज्य पुणे यांचे परिपत्रक जा.क्र. २४७४ दि. ३१.१०.२०१८ मधील सुचना (अ) ४ चे उल्लंघन केलेले आहे.त्याच बरोबर आपला आदेश जा.क्र. ६२८ दि. ०५.०२.२०२४ मधील अटी व शर्त क्र. १३ चे देखील उल्लंघन केलेले आहे.त्यामुळे सदरील पतसंस्थेच्या आडमुठ्या पणामुळे जिल्हा उपनिबंधक बीड अडचणीत येणार असल्याचे समोर आले आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की,आष्टी येथील बेदरे पियुष सतिष व इतर रा. एस.एम. बेदरे सराफ,संभाजी चौक, यांनी दिलेल्या तक्रारीत म्हटले,माहीती अधिकारातुन मिळालेल्या माहिती नुसार आपण आष्टी नागरी सहकारी पतसंस्था मर्या. आष्टी यांना जा.क्र. ६२८ दि.१५.०२.२०२४ अन्वये महाराष्ट्र राज्य सहकारी कायदा १९६० चे कलम १५६ नियम १९६१ चा १०७ अन्वये अधिकार दिलेले आहेत.परंतु सदरील पतसंस्थेच्या वसुली अधिकाऱ्याने आपली व सहकार विभागाची फसवणुक करत मा. सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था महाराष्ट्र राज्य पुणे यांचे परिपत्रक जा.क्र. २४७४ दि. ३१.१०.२०१८ मधील सुचना (अ) ४ चे उल्लंघन केलेले आहे. त्याच बरोबर आपला आदेश जा.क्र. ६२८ दि. ०५.०२.२०२४ मधील अटी व शर्त क्र.१३ चे देखील उल्लंघन केलेले आहे.उपरोक्त अटी व शर्तीनुसार ज्या पदाधिकारी / अधिकारी यांना वसुलीचे अधिकार प्रदान करण्यात येतील त्यांनी ०३ वर्षातुन किमान एकदा मान्यता प्राप्त संस्थेकडुन ०३ दिवसाचे प्रशिक्षण घेणे आवश्यक असताना आष्टी नागरी सहकारी पतसंस्था मर्या. आष्टी चे वसुली अधिकारी पोकळे काका कारभारी व शेलार आनंद कारभारी यांनी महाराष्ट्र राज्य सहकरी पतसंस्था फेडरेशन चे दि. ०७.१०.२०२३ ते ०८.१०.२०२३ या दोनच दिवसाचे प्रशिक्षण घेतले आहे. संबंधीत वसुली अधिकारी यांनी आपली व सहकार विभागाची फसवणुक केलेली आहे. त्यामुळे त्यांना दिलेले १५६ चे अधिकार तात्काळ रद्द करुन त्यांच्या सहीने काढलेल्या आदेशांना तात्काळ स्थगीती देण्यात यावी.तसेच त्यांनी आपली व सहकार विभागाची फसवणुक केली म्हणुन त्यांचे विरुध्द भा.न.स. ३१८ (४) अन्वये कायदेशिर कारवाई करण्यात यावी. यावर आपन तात्काळ ०८ दिवसाच्या निर्णय घेवुन आम्हाला कळवावा. आपण यावर योग्य ती कायदेशिर कारवाई ०८ दिवसाच्या आत न केल्यास आपणा विरुध्द व संबंधीत वसुली अधिकाऱ्या विरुध्द मा.उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ छत्रपती संभाजीनगर येथे याचीका दाखल केली जाईल. होणाऱ्या परिनामास व खर्चास आपण जबाबदार रहाल याची गांभीर्याने दखल घ्यावी.असेही दिलेल्या तक्रारीत म्हटले आहे.

# वडवणी ते थेटेगव्हाण रस्त्यासाठी थेटेगव्हाण फाटा येथे रास्ता रोको आंदोलन

वडवणी । प्रतिनिधी

वडवणी ते थेटेगव्हण व चिंचवण -कोठरबन-चोरांबा या रस्त्यासाठी थेटेगव्हण फाटा येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक येथे दि.४एप्रिल २०२५शुक्रवार रोजी सकाळी १०वा.रास्ता रोको आंदोलन करण्यात येणार आहे तरी डोंगरपट्ट्यातील नागरिकांना या रास्तारोको आंदोलनास मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन करण्यात येत आहे.



वडवणी ते थेटेगव्हाण व चिंचवण-कोठरबन-चोरांबा ह्या रस्ता अत्यंत खराब झाला असून या रस्त्यावर मोठ-मोठे खड्डे पडले असून या रस्त्याकडे लोकप्रतिनिधीचे दुर्लक्ष असून यामुळे या डोंगरपट्ट्यातील लोकांना व वाहनधारकांना त्रास सहन करावा लागत आहे. वडवणी ते थेटेगव्हण हा रस्ता डोंगरपट्ट्यातील नागरीकांसाठी दळणवळणाचा आहे.व हा रस्ता वडवणी व धारूर या दोन तालुक्याला जोडणारा रस्ता आहे.आणी ह्याच रस्त्यावर मोठ मोठे खड्डे पडले असल्याने ह्या रस्त्याची दुरवस्था झाली आहे यामुळे वाहनधारकांना वाहन चालवताना तारेवरची कसरत करावी लागत आहे.तर काही वाहनधारक तर तेलगाव मार्गे जात असल्याने त्यांना आर्थिक भुर्दंड सोसावा लागत आहे.तरी शासनाचे या प्रश्नाकडे लक्ष वेधण्यासाठी दि.४/४/२०२५ शुक्रवार रोजी सकाळी १० वा.थेटेगव्हण फाटा येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक येथे चिंचवण,पहाडी दहिफळ,पहाडी पारगाव,धुनकवाड,चारदरी व कोठारबन येथील ग्रामस्थ रास्तारोको आंदोलन करणार आहोत.तरी डोंगरपट्यातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन करण्यात येत आहे.

# निजाम यांचा शिवसेनेने सन्मान राखला, त्यांच्याकडे त्याग, संयम, स्थिरता नाही

बीड । प्रतिनिधी

शिवसेना पक्ष हा निष्ठावंत शिवसैनिकांच्या ताकतीवर आज ही भक्कम टिकून आहे. इतर पक्षातून येणाऱ्यांना उद्धव साहेबांनी तेव्हढाच सन्मान दिला. बीड चे शेख निजामही याला अपवाद ठरले नाहीत. एम आय एम मधून शिवसेनेत प्रवेश केला आणि बीड शहर प्रमुख पद मिळवले. परंतु त्यांच्याकडे निष्ठावंत शिवसैनिका प्रमाणे त्याग, समर्पण, संयम व स्थिरता नही. अजितदादा यांच्या राष्ट्रवादी पक्षाने त्यांच्या सर्व अपेक्षा पूर्ण कराव्यात असा उपरोधीक टोला जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांनी लागवला आहे.



शेख निजाम शिवसैनिक केव्हाच नव्हते. परंतु एक मुस्लिम चेहरा असल्यामुळे पक्षाने त्यांचा एका शिवसैनिका प्रमाणे सन्मान राखला. त्यांना शहर प्रमुख केले. या उलट शेख निजाम यांनी पक्षाला काय दिले असा सवाल आज शिवसैनिक करत असल्याचे उल्हास गिराम यांनी सांगितले. आज अजितदादा यांच्या राष्ट्रवादी पक्षात शेख निजाम प्रवेश करत असुन दादांनी निजाम यांच्या सर्व अपेक्ष पूर्ण कराव्यात व त्यांना स्थिरता द्यावी.

# नागडगावमध्ये भरदिवसा घराचे कुलूप तोडून जबरी चोरी

## अज्ञात चोरट्यांनी साडेपाच लाखाचा मुद्देमाल केला लंपास

माजलगाव । प्रतिनिधी

तालुक्यातील नागडगाव येथील माजलगाव आगारा मध्ये मेकॅनिक म्हणून कार्यरत असलेल्या परीवाहान मंडळाच्या कर्मचाऱ्यांच्या घराचे भरदिवसा कुलूप तोडून जबरी चोरी करण्यात आली आहे.ही घटना दि ३१ मार्च सोमवार रोजी दुपारी घडली आहे. दरम्यान अज्ञात चोरट्यांनी घरातील सोन्या-चांदीच्या दागिन्यासह जवळपास साडेपाच लाखाचा मुद्देमाल लंपास केला आहे.

नागडगाव येथील लक्ष्मण आश्रुबा खामकर, वयः ५२ वर्षे, व्यवसायः कर्मचारी माजलगाव आगार मॅकेनिक,हे ड्युटीसाठी दि.३१ मार्च सोमवार रोजी माजलगाव आगारात आले होते.तर घरातील इतर मंडळी हे शेतावर कामासाठी गेले होते.यावेळी दुपारी ४:०० वाजता त्यांना फोनवरून माहिती मिळाली की, त्यांच्या घराचे कुलूप तोडून घरात चोरी झाली आहे. दरम्यान खामकर यांनी नागडगाव येथे जाऊन घराची पाहणी केली.असता घरातील कपाटातील सोन्या-चांदीचे दागिने सोन्याचे साखळी गंठण २.७ तोळे वजनाचे, सोन्याचे मिनी गंठण १.४ तोळे वजनाचे, सोन्याच्या ५ ग्रॅम चे तीन अंगठ्या १.५ तोळे वजनाचे, सोन्याचा तुकडा ०१ तोळे वजनाचे, सोन्याचे मिनी गंठण ५ ग्रॅम वजनाचे, सोन्याचे साखळी व ओम ५ ग्रॅम वजनाचे,सोन्याचे ओम ०५ नग एकुण ०५ ग्रॅम वजनाचे, सोन्याची ठुशी ०४ ग्रॅम वजनाचे, सोन्याच्या तीन बाळ्या ०३ ग्रॅम वजनाचे,सोन्याच्या कानातील पत्ते ०३ ग्रॅम वजनाचे, सोन्याचे कुडके व हुजुर ०२ ग्रॅम वजनाचे,सोन्याची अंगठी पिळदार ०३ ग्रॅम वजनाचे, सोन्याचे हुजुर ०१ ग्रॅम वजनाचे, सोन्याची बाळी ०१ ग्रॅम वजनाचे सोन्याचे हुजुर जोड ०१ ग्रॅम वजनाचे, सोन्याचे मनी ०१ ग्रॅम वजनाचे, चांदीचे हातातील ब्रासलेट ६० ग्रॅम वजनाचे,चांदीचे कडे ६० ग्रॅम वजनाचे,चांदीचे करंडा,चार वाटी पंचपाळ,दोन वाटी पंचपाळ ४० ग्रॅम वजनाचे, चांदीचे पायातील जोडवे ४० ग्रॅम वजनाचे,चांदीचे बाजुबंद,बांगड्या, कमरेचा छल्ला ४० ग्रॅम वजनाचे, चांदीचे जोडवे ४ नग १० ग्रॅम वजनाचे व रोख रक्कम १२००० पाचशे रुपये असा एकूण ५ लाख ३७ हजार रुपयाचा मुद्देमाल अज्ञात चोरट्यांनी लंपास केला.दरम्यान अज्ञात चोरट्या विरोधात लक्ष्मण आश्रुबा खामकर यांच्या फिर्यादी वरून गुन्हा दाखल करण्यात आला आहे.पुढील तपास पोलीस करत आहेत



# अखंड रामनाम सप्ताहमध्ये राम जन्म व राम सिता विवाह सोहळा

युसूफवडगांव । प्रतिनिधी

केज तालुक्यातील युसूफवडगांव येथे सुरू असलेल्या अखंड रामनाम सप्ताह व रामकथा मध्ये आज राम जन्म व राम सिता विवाह सोहळा हजारो भाविकांच्या उपस्थित संपन्न झाला.

गेल्या तीन दिवसापासुन युसूफवडगांव येथे रामजन्मोत्सवाच्या निमित्ताने अखंड रामनाम सप्ताह व रामकथा सोहळा चालु असुन यामध्ये आजच्या रामकथेमध्ये प्रभु श्री राम यांचा जन्म सोहळा पार पडला यावेळी उपसरपंच महेश लामतुरे यांचे चिरंजीव शाश्वत हा चिमुरडा बाल रामाच्या वेशात होता,तर याच वेळी प्रभु श्री राम व माता सिता यांचा स्वयंवर व विवाह सोहळा सुद्धा याच वेळी पार पडला राम यांच्या वेशात संजु मोडवे व सिता मातेच्या वेशात सौ.पुजा मोडवे या होत्या तर हजारो रामभक्तांच्या उपस्थित हा राम जन्मोत्सव व राम सिता विवाह सोहळा संपन्न झाला.

# सार्वजनिक रस्ता अडवण्यात ग्रामसेवकाचा हात ?

**माजलगाव । प्रतिनिधी**

तालुक्यातील भाटवगाव नवीन वसाहत येथील सार्वजनिक रस्तावर पत्र्याचे शेड उभारून सार्वजनिक रस्ता अडवून शाळेतील विद्यार्थी विद्यार्थीनी सह रहिवासी यांना रहदारीस मज्जाव करण्यात ग्रामसेवक यांचाच हात आहे तो रस्ता पुर्ववत चालू करून द्यावा या मागणीसाठी आज दि ०३ मार्च गुरुवार रोजी पंचायत समिती कार्यालय समोर सामाजिक कार्यकर्ते सुरेश साळवे व रमेश साळवे हे आमरण उपोषणाला बसणार आहेत.

या विषय सविस्तर माहिती अशी की, तालुक्यातील भाटवगाव ग्रामपंचायत अंतर्गत व माजलगाव शहरा जवळ असलेल्या गट नंबर १३८ मध्ये चंद्रशेखर साखरे व उत्तम राठोड यांच्या मधून जाणार रस्ता हा प्लॉट दाखवून खरेदी विक्री केला



आहे.तो प्लॉट ग्रामसेवक चव्हाण महाराज यांच्या पुतणे कमलेश लालासाहेब चव्हाण यांच्या नावाने आहे व त्या प्लॉटवर ग्रामसेवक यांच्या संमतीने इतर व्यक्तीने पत्र्याचे शेड उभारण्यास ग्रामसेवकानेच हात भार लावून सार्वजनिक रस्ता अडवून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण केला असल्याचे चर्चा होत आहे वास्तविक पाहता त्या प्लॅटची दक्षिण उत्तर बाजु ३० फुट दाखवली आहे ती बाजू २२ फुटच आहे व हा रस्ता २० फुटाचा आहे व ज्या नंबरचा तो प्लॉट आहे तो प्लॉट नकाशात नाही तर नकाशात रस्ताच दाखवला आहे असे रहिवासी सांगतात.ग्रामसेवक चव्हाण हे ग्रामपंचायतची दिशाभूल करीत असुन रस्ताच बळकावून रहदारीस अडथळा निर्माण करून रहिवाशांना त्रास देत असल्याचे बोलले जात आहे.अशा ग्रामसेवकासह रस्ता विक्री खरेदी चा व्यवहार करणाऱ्यावर कायदेशीर कारवाई करावी या मागणीसाठी आज दि ३ एप्रिल गुरुवार रोजी येथील पंचायत समिती कार्यालयासमोर सामाजिक कार्यकर्ते सुरेश साळवे व रमेश साळवे हे आमरण उपोषण करणार आहेत.

# चेक न वटल्यामुळे आरोपीस ५ लाख रुपये दंड व १५ दिवस शिक्षा

**म्हसोबावाडी । प्रतिनिधी**

तालुक्यातील कडा येथील राजमाता महिला ग्रामीण बिगर शेती सह.पतसंस्था मर्या.कडा या पतसंस्थेकडून आरोपी बाबु बलभीम नवले रा. देविनिमगाव ता आष्टी यांनी कुक्कुट पालनसाठी ७,३०,०००/कर्ज घेतले होते. सदर कर्ज आरोपीने फेडले नाही अगर आरोपीकडे थकीत कर्जाची रक्कम जास्त असल्यामुळे फिर्यादी मैनेजर वसूलीसाठी गेला असता आरोपीने थकीत रक्कम पोटी फिर्यादी पतसंस्थेस रक्कम ४००००० चा चेक दिला होता सदर चेक निधी अभावी न वटल्यामुळे फिर्यादी पतसंस्थेने आरोपी विरुद्ध आष्टी न्यायालयात कि.के. न ३४७/२०२१ ही दाखल केली होती. सदर केसमध्ये साक्ष म्हणून वसूली अधिकारी श्री हर्षवर्धन उद्धव पडोळे यांची साक्ष नोंदविण्यात आली व इतर कागदपत्र पुरावे कामी देण्यात आली फिर्यादीची साक्ष व कागदपत्र पाहून आरोपीस दोषी धरून आष्टी न्यायालयाचे न्यायाधीश श्री एम के पाटील साहेब यांनी खरेदी पतसंस्थेस रुपये ५००,००० दंड म्हणून देण्याचे आदेश केले व १५ दिवसाची साधी कैद शिक्षा ठोठावण्यात आली. असा निकाल दि २९/३/२०२५ रोजी देण्यात आला फिर्यादीतर्फे ॲड बी डी एकसिंगे यांनी काम पाहिले.त्यांना ॲड संदिप ढोबळे यांनी सहकार्य केले.

# टुकुर नदीवरील बंधारे करण्याचे अजितदादांचे ठोस आश्वासन

**बीड । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील टुकुर नदीवरील दहा ते बारा गावच्या पाण्याचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी या ठिकाणी जवळपास ९ बंधारे व्हावेत अशी मागणी या परिसरातील शेतकऱ्यांनी अजित दादा यांच्याकडे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजित दादा पवार यांच्याकडे केली. त्यांनी हे सर्व प्रश्न मार्गी लावण्यासाठी मी जातीने लक्ष घालून गोदावरी खोरे विकास महामंडळातून हे बंधारे पूर्ण करण्याचे ठोस आश्वासन परिसरातील गावच्या शेतकऱ्यांना दिले. बीड जिल्हाधिकारी कार्यालयात बुधवारी झालेल्या आढावा बैठकीनंतर पालकमंत्री अजितदादा पवार यांची या परिसरातील शेतकऱ्यांनी भेट घेऊन आपली मागणी निवेदनाद्वारे त्यांच्यासमोर मांडली यासाठी आमदार संदीप क्षीरसागर यांनी मध्यस्थी केली. या भेटीनंतर अजित दादा पवार यांनी या शेतकऱ्यांना हा प्रश्न मार्गी लावण्यासाठी मी स्वतः प्रयत्न करीन तसेच हा प्रश्न जलसंधारण विभागाचा असल्याने गोदावरी खोरे विकास महामंडळातून याला निधी देता येईल असे सांगून त्यासाठी मी स्वतः प्रयत्न करीन आणि कुठे आडले तर मला थेट बोला शेतकऱ्याचा प्रश्न सुटला पाहिजे. असे ठोस आश्वासन अजित दादा पवार यांनी दिले.

गेल्या अनेक दिवसांपासून या टुकूर नदीवरील बंधारे व्हावे त्यासाठी बीड विधानसभेचे आमदार संदीप क्षीरसागर हे प्रयत्न करत आहेत. त्यांनी या परिसरातील नऊ कोल्हापुरी टाईप बांधणाऱ्यांचे प्रस्ताव शासनाकडे सादर केलेले आहेत मात्र त्यांना प्रशासकीय मान्यता मिळाली नव्हती आता दादांच्या माध्यमातून हा विषय मार्गी लागणार आहे. शेतकऱ्यांची यासंदर्भात वारंवार मागणी पाहता आ. संदीप क्षीरसागर यांनी मध्यस्थी करून परिसरातील गावच्या शेतकऱ्यांची थेट अजित दादा पवार यांच्याशी भेट घडवून आणली. यावेळी दादांनी सर्व प्रश्न समजून घेऊन शेतकऱ्यांच्या अडचण समजून घेत हा प्रश्न मार्गी लावण्याचे ठोस आश्वासन दिलेले आहे. याचा पाठपुरावा करण्यासाठी आमदार संदीप क्षीरसागर यांना सूचित करण्यात आले आहे. या भेटीनंतर आमदार संदीप क्षीरसागर यांनी आपण शेवटपर्यंतचा पाठपुरावा करणार असून ज्या ज्या वेळेस शेतकऱ्यांची गरज लागेल त्या त्या वेळी सर्व शेतकरी आमदारांना पाठिंबा देतील असे आश्वासन यावेळी शेतकऱ्यांनी दिले. परिसरातील शेतकऱ्यांमधून प्रमुख १० शेतकरी प्रतिनिधींनी हा प्रश्न त्यांच्यासमोर मांडला. शिष्टमंडळामध्ये युवा कार्यकर्ते राजेंद्र आमटे, विक्रम साळुंके, सुभाष गिराम, नारायण साळुंके, विष्णू साळुंके, किशोर ढोकणे , अशोक शिंदे ,संजय खुरणे, सुधाकर काकडे यांच्यासह परिसरातील ५०० शेतकरी उपस्थित होते.



गोदावरी खोरे विकास महामंडळातून बंधारे करणार

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# पिंपरीत गादी कारखान्यात आग; दोन जखमी तर सात तरुणींना, नेमके काय घडले?

**पिंपरी । प्रतिनिधी**

पिंपरी मधील झिरो बॉईज चौकात गादी कारखाना आणि फर्निचर दुकानाला बुधवारी (२ एप्रिल) सायंकाळी पाच वाजताच्या सुमारास आग लागली. दुकानाच्या इमारतीमध्ये भाड्याने राहणाऱ्या सात तरुणींना अग्निशमन दलाच्या जवानांनी सुरक्षित ठिकाणी हलवले. तर या आगीमध्ये दोन तरुणी जखमी झाल्या आहेत. चेतना वासुदेव सावरकर (वय २६), अश्विनी प्रमोदराव वाखडे (वय २४, रा. पिंपरी) अशी जखमींची नावे आहेत.

झिरो बॉईज चौकात नितीन जाधव यांची इमारत आहे. या इमारतीच्या वरील बाजूला वन बीएचके दोन आणि वन आरके दोन सदनिका आहेत. इमारतीच्या ग्राउंड फ्लोअरवर परमेश्वर इंटरप्रायजेस नावाचा गादी कारखाना आणि सजावट फर्निचर ही दोन दुकाने आहेत. इलेक्ट्रिक शॉर्ट सर्किट झाल्याने दोन्ही दुकानांना बुधवारी सायंकाळी आग लागली. कापसाला आग लागल्याने आग अचानक भडकली.

घटनेची माहिती मिळताच पिंपरी-चिंचवड अग्निशमन दलाच्या मुख्य केंद्रातील चार, भोसरी, मोशी, चिखली, प्राधिकरण, थेरगाव येथील प्रत्येकी एक असे एकूण नऊ बंब घटनास्थळी दाखल झाले. जवानांनी पाणी



मारून आग विझवली. या घटनेत चेतना आणि अश्विनी या दोन तरुणी किरकोळ जखमी झाल्या. दरम्यान, इमारतीमधील एका सदनिकेत सात तरुणी अडकल्या होत्या. त्यांना अग्निशमन दलाच्या जवानांनी सुखरूपपणे बाहेर काढले. जखमींवर नजीकच्या रुग्णालयात उपचार सुरु आहेत. धनकवडीमध्ये चहाच्या हॉटेलमध्ये आग


हॉटेलमध्ये दूध तापविताना सिलेंडरमधून गॅसची गळती होउन लागलेल्या आगीत २४ वर्षीय कामगार ठार झाला आहे. ऐन गुढीपाडव्याच्या दिवशीच धनकवडीत आगीच्या घटनेमुळे शोककळा पसरली आहे. आगीची घटना रविवारी संध्याकाळी सव्वा चारच्या सुमारास धनकवडी के के मार्केटनजीक साईबा हॉटेलमध्ये घडली आहे. संतोष (वय २४) असे ठार झालेल्या कामगाराचे नाव आहे. धनकवडी परिसरातील के के मार्केटनजीक साईबा हॉटेल असून, त्याठिकाणी ३० मार्चला संध्याकाळी सव्वा चारला आग लागल्याची माहिती अग्निशमक दलाला मिळाली. कात्रज व गंगाधाम अग्निशमन केंद्राचे वाहन रवाना करण्यात आले. घटनास्थळी जवानांनी धाव घेत हॉटेलमध्ये अडकलेल्या कामगाराला बाहेर काढण्यास प्राधान्य दिले. पाण्याचा मारा करत कामगारास जवानांनी जखमी अवस्थेत बाहेर काढून तातडीने उपचाराकरिता रुग्णालयात दाखल केले. तेथील आग पुर्ण विझवत धोका दुर केला.पुण्यातील धनकवडीमध्ये चहाच्या हॉटेलमध्ये आग, कामगाराचा मृत्यू

शेजारी असलेल्या दोन दुकानांना आगीची झळ बसून काही नुकसान झाले. वेळीच आग आटोक्यात आणल्याने इतरत्र पसरली नाही. आगीमध्ये हॉटेलमधील सर्व साहित्य जळाले असून, दुध तापवित असताना वायूगळती झाल्यामुळे सिलेंडरमुळे आग लागली. त्याचवेळी संतोषला हॉटेलबाहेर पडता आले नाही. त्यामुळे गुदमरून त्याचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी घोषित केले. हॉटेलमध्ये एकूण आठपैकी तीन सिलेंडरमधून त्यापैंकी मोठ्या प्रमाणात वायुगळती झाली. आगीमध्ये कामगाराचा मृत्यू झाला आहे. आगीवर नियंत्रण आणण्यासाठी स्टेशन ऑफीसर सुनील नाईकनवरे, रामदास शिंदे, भरत वाडकर, बांदीवडेकर यांच्यासह इतर अधिकारी-कर्मचार्यांनी प्राधान्य दिले.

# चौथ्या मजल्यावरुन उडी मारुन विवाहितेची आत्महत्या; शिरुर तालुक्यातील खळबळजनक घटना

**शिक्रापूर । प्रतिनिधी**

राज्यात आत्महत्येचे प्रमाण वाढले आहे. राज्यातील वेगवेगळ्या भागातून आत्महत्येच्या घटना उघडकीस येत असतात. अशातचं आता पुणे जिल्ह्यातून एक मोठी बातमी समोर आली आहे. तळेगाव ढमढेरे (ता. शिरुर) येथे पती व सासूच्या वादातून इमारतीच्या चौथ्या मजल्यावरून उडी मारून विवाहितेने आत्महत्या केल्याची खळबळजनक घटना घडली आहे. पोर्णिमा गणेश धोत्रे आत्महत्या केलेल्या विवाहितेचे नाव असून, पती गणेश तानाजी धोत्रे, सासू मंगल तानाजी धोत्रे व नणंद सोनाली लखन यांच्याविरुद्ध आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



एका विवाहितेचा इमारतीच्या चौथ्या मजल्यावरून उडी मारून पोर्णिमा गणेश धोत्रे या विवाहितेने आत्महत्या केल्याची खळबळजनक घटना शिक्रापूर पोलीस स्टेशन येथे विवाहितेचा पती गणेश तानाजी धोत्रे, सासू मंगल तानाजी धोत्रे व नणंद सोनाली लखन यांच्या विरुद्ध आत्महत्येस प्रवृत्त केल्या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तळेगाव ढमढेरे (ता. शिरुर) येथे राहणाऱ्या पोर्णिमा धोत्रे हिचा तीन महिन्यांपूर्वी विवाह झालेला होता, विवाहानंतर पोर्णिमाचा पती गणेश, सासू मंगल तसेच नणंद सोनाली हे पोर्णिमाला किरकोळ कारणातून शिवीगाळ, दमदाटी करत तू केलेले जेवण जास्त बनवते ते वाया जाते, तुझ्यामुळे आमची बरबादी झाली, तू आमच्या घरातून निघून जा असे म्हणून तिचा मानसिक व शारीरिक छळ करत होते. वारंवार होणारा त्रास सहन न झाल्याने तसेच होणाऱ्या त्रासाला कंटाळून ३० मार्च रोजी पोर्णिमाने घराला बाहेरुन कडी लावून इमारतीच्या छतावर जाऊन चौथ्या मजल्यावरुन उडी मारली. दरम्यान पोर्णिमा गंभीर जखमी झाल्याने तिला उपचारासाठी खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले, मात्र उपचारादरम्यान पोर्णिमाचा मृत्यू झाला. याबाबत विवाहितेचे वडील रामदास गेनबा जाधव (वय ५० वर्षे) डोंगरगाववाडी लोणावळा (ता. मावळ जि. पुणे) यांनी शिक्रापूर पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिल्याने पोलिसांनी विवाहितेचा पती गणेश तानाजी धोत्रे, सासू मंगल तानाजी धोत्रे दोघे (रा. तळेगाव ढमढेरे ता. शिरुर जि. पुणे), नणंद सोनाली लखन ननवरे (रा. खर्डा ता. जामखेड जि. अहिल्यानगर) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करत गणेश तानाजी धोत्रे व मंगल तानाजी धोत्रे या दोघांना अटक केली असून, पुढील तपास सहाय्यक महिला पोलीस निरीक्षक रोहिणी सोनावले करत आहेत.

# पुणे पुन्हा हादरलं! पतीने पत्नीवर केले कुऱ्हाडीने वार; कारण वाचून व्हाल थक्क; आरोपीला अटक

**पुणे । प्रतिनिधी**


तळजाई वसाहत परिसरात दारू पिण्यास पैसे न दिल्याने पतीने पत्नीवर कुऱ्हाडीने वार केल्याची घटना घडली. याप्रकरणी पोलिसांनी पतीला अटक केली.

पूनम दत्ता अडागळे (वय ३२, रा. खंडाळे चौक, तळजाई वसाहत, पद्मावती) असे गंभीर जखमी झालेल्या महिलेचे नाव आहे. याप्रकरणी पती दत्ता राजाराम अडागळे (वय ३८) याला अटक करण्यात आली. याबाबत पूनम यांनी सहकारनगर पोलिसांत तक्रार दिली आहे.

पोलिसांच्या माहितीनुसार, दत्ता याचा पूनमशी २०१५ मध्ये विवाह झाला असून, त्यांना ७ वर्षांचा मुलगा आहे. दत्ता काहीही काम करत नव्हता, तसेच त्याला दारूचे व्यसन आहे. पूनम घरकाम करतात. सोमवारी (३१ मार्च) रात्री आठच्या सुमारास दत्ता दारू पिऊन घरी आला. त्याने दारू पिण्यासाठी पूनमकडे पैसे मागितले. तिने पैसे देण्यास नकार. त्यानंतर चिडलेल्या दत्ताने घरातील कुऱ्हाडीने पूनमवर हल्ला केला. पूनमने आरडाओरडा केला. तेव्हा सासूने मध्यस्थी करण्याचा प्रयत्न केला. कुर्हाडीचा डोक्यात घाव बसल्याने पूनम या गंभीर जखमी झाल्या. दत्ताला पोलिसांनी अटक केली असून, अधिक तपास उपनिरीक्षक रेखा साळुंके तपास करत आहेत.

भरधाव दुचाकी घसरून तरुणाचा मृत्यू

वारजे माळवाडी परिसरात भरधाव दुचाकी



घसरून सहप्रवासी तरुणाचा मृत्यू झाल्याची घटना मुंबई-बंगळुरू बाह्यवळण मार्गावर घडली आहे. याप्रकरणी दुचाकीस्वारावर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. जय भगवान अवघड (वय २२, सध्या रा. अक्षरा पीजी. लक्ष्मी चौक, हिंजवडी फेज एक) असे मृत्यू झालेल्या सहप्रवासी तरुणाचे नाव आहे. अपघातात दुचाकीस्वार शुभम भाऊसाहेब काकडे (वय २४, सध्या रा. अक्षरा पीजी. लक्ष्मी चौक, हिंजवडी, फेज एक) जखमी झाला आहे. याबाबत जय याचे वडील भगवान सुखदेव अवघड (वय ४८,रा. वाकळुनी, ता. बदनापुर, जि. जालना) यांनी वारजे माळवाडी पोलिसांत तक्रार दिली आहे.

पुण्यात भीषण अपघात; भरधाव दुचाकी घसरून तरुणाचा मृत्यू

पोलिसांच्या माहितीनुसार, जय मूळचा जालना जिल्ह्यातील वाकळुनी गावचा रहिवासी आहे. रविवारी (३० मार्च) दुपारी साडेबाराच्या सुमारास दुचाकीस्वार शुभम आणि त्याचा मित्र जय हे मुंबई-बंगळुरू बाह्यवळण मार्गावरुन निघाले होते. वारजेतील स्वीट कॉर्नर दुकानाजवळ भरधाव दुचाकीस्वार शुभमचे नियंत्रण सुटले. दुचाकी घसरल्याने सहप्रवासी जय याच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली, तसेच दुचाकीस्वार शुभम जखमी झाला. अपघाताची माहिती मिळताच पोलिसांनी येथे धाव घेतली. दोघांना तातडीने खासगी रुग्णालयात दाखल केले. परंतु, उपचारांदरम्यान जयचा मृत्यू झाला. अधिक तपास उपनिरीक्षक नाईकवाडे करत आहेत.

# चाकूने भोकसून खुनाचा प्रयत्न करणार्या दोघांवर गुन्हा दाखल; पुण्यात घडला धक्कादायक प्रकार

**पुणे । प्रतिनिधी**

रमजान ईदच्या दिवशी रात्री नमाज पठाण करून घरी निघालेल्या एकाला रस्त्यात आडवून चाकुने पोटात भोकसून खुनाचा प्रयत्न केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. याप्रकरणी सलिम शेख आणि अमिर शेख (दोघेही रा. मार्कडेयनगर, वैदवाडी हडपसर ) यांच्यावर वानवडी पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत आवेज फिरोज शेख (वय २३, रा. मार्कडेयनगर, वैद्यावाडी, हडपसर) यांनी तक्रार दिली आहे.

पोलिसांच्या माहितीनुसार, तक्रारदार हे रमजान ईदच्या दिवशी रात्री साडे आठच्या सुमारास वैदवाडी येथील अंजुमन तालीमुन मश्जीद येथून नमाज पठण करून परत निघाले होते. ते वैद्यवाडी येथील भिम साम्राज्य प्रतिष्ठान येथे आले असता त्यांना गर्दी झालेली दिसली. त्यांनी पाहिले असता तक्रारदार यांचे मामा सलजीम अमिन सय्यद यांना त्यांच्याच वस्तीत राहणारा सलीम शेख व त्याचा मोठा भाऊ अमिर शेख हे दोघेजण मारहाण करत होते. त्यावेळी सलिमशेख याच्या हातात सुर्या सारखे धारदार हत्यार होते.



अमिर शेखने सलीम सय्यद यांची कॉलर पकडून सलीम शेख यास म्हणाला की, डाल दे इसके पेट में, सलीमने चाकू मामा सलीम सय्यद यांच्या पोटात खुपसला. यावेळी त्यांच्या पोटातून रक्तस्राव होऊ लागला. हे पाहून तक्रारदार वाद सोडविण्यास मध्ये पडले. त्यावेळी अमिर शेख तेथून पळून गेला. मात्र सलीम याला पकडून ठेवले. त्यानंतर रिक्षातून सय्यद यांना रूग्णालयात दाखल केले.

पतीने पत्नीवर केले कुऱ्हाडीने वार

तळजाई वसाहत परिसरात दारू पिण्यास पैसे न दिल्याने पतीने पत्नीवर कुऱ्हाडीने वार केल्याची घटना घडली. याप्रकरणी पोलिसांनी पतीला अटक केली. पूनम दत्ता अडागळे (वय ३२, रा. खंडाळे चौक, तळजाई वसाहत, पद्मावती) असे गंभीर जखमी झालेल्या महिलेचे नाव आहे. याप्रकरणी पती दत्ता राजाराम अडागळे (वय ३८) याला अटक करण्यात आली. याबाबत पूनम यांनी सहकारनगर पोलिसांत तक्रार दिली आहे.पुणे पुन्हा हादरलं! पतीने पत्नीवर केले कुऱ्हाडीने वार; कारण वाचून व्हाल थक्क; आरोपीला अटक

पोलिसांच्या माहितीनुसार, दत्ता याचा पूनमशी २०१५ मध्ये विवाह झाला असून, त्यांना ७ वर्षांचा मुलगा आहे. दत्ता काहीही काम करत नव्हता, तसेच त्याला दारूचे व्यसन आहे. पूनम घरकाम करतात. सोमवारी (३१ मार्च) रात्री आठच्या सुमारास दत्ता दारू पिऊन घरी आला. त्याने दारू पिण्यासाठी पूनमकडे पैसे मागितले. तिने पैसे देण्यास नकार. त्यानंतर चिडलेल्या दत्ताने घरातील कुऱ्हाडीने पूनमवर हल्ला केला. पूनमने आरडाओरडा केला. तेव्हा सासूने मध्यस्थी करण्याचा प्रयत्न केला. कुर्हाडीचा डोक्यात घाव बसल्याने पूनम या गंभीर जखमी झाल्या. दत्ताला पोलिसांनी अटक केली असून, अधिक तपास उपनिरीक्षक रेखा साळुंके तपास करत आहेत.

# नवोदय पात्र विद्यार्थी अनमोल गोतावळेचा सत्कार

**किल्ले धारूर । प्रतिनिधी**

धारूर येथील अनमोल दत्ता गोतावळे याने अवघड असणाऱ्या नवोदय विद्यालयाच्या परीक्षेत ९७.५० गुण मिळून अव्वल स्थान मिळवत नवोदय विद्यालयास प्रवेश मिळवला आहे .त्याबद्दल त्याचा सत्कार ढगे कोचिंग क्लासेसचे संचालक नाथा ढगे यांच्या हस्ते करण्यात आला.

१८ जानेवारी रोजी नवोदय विद्यालयाची परीक्षा झाली होती याचा निकाल नुकताच लागला अवघड असणाऱ्या या परीक्षेला जिल्हाभरातून १५००० विद्यार्थी बसले होते यापैकी केवळ ८० विद्यार्थ्यांची निवड झाली आहे. यामध्ये अनमोल दत्ता गोतावळे यांने स्थान मिळवले असून त्याचा नवोदय विद्यालय गढी या ठिकाणी पुढील शिक्षणासाठी



निवड झाली आहे.

त्याबद्दल त्याचा सत्कार येथील आदर्श शिक्षक नवोदय तज्ञ नाथा ढगे यांच्या हस्ते करण्यात आला. या सत्कार प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून शिक्षक संघटनेचे जिल्हाध्यक्ष रमेश रुद्रे, चिंचपूर येथील उद्योजक अर्जुन लांब उपस्थित होते.

प्रथम अनमोलचे आई - वडील दत्ता गोतावळे व सौ गोतावळे यांचा सत्कार करण्यात आला .त्यानंतर अनमोलचा सत्कार करण्यात आला सत्कार प्रसंगी अनमोल गोतावळे म्हणाला माझ्यामुळे आई-वडिलांचा सत्कार होणं हा माझ्यासाठी सर्वोच्च सन्मान आहे. यापूर्वीही नाथा ढगे यांच्या मार्गदर्शनाने ९८ विद्यार्थ्यांची निवड झाली आहे. नवोदय विद्यालया मध्ये सहावी ते बारावी शिक्षण मोफत दिले जाते केंद्रीय बोर्डाचे शिक्षण असल्याने या शाळेकडे पालकांचा ओढा असतो. अनमोलच्या यशाबद्दल सर्वत्र त्याचे स्वागत होत आहे.

# मावळात अनैतिक संबंधातून २२ वर्षीय तरुणाची हत्या; कोयत्याने सपासप वार केले अन

**वडगाव मावळ । प्रतिनिधी**

मावळ तालुक्यात अनैतिक संबंधातून एकाने २२ वर्षीय तरुणावर कोयत्याने मानेवर वार करून खून केल्याची धक्कादायक घटना समोर आली. ही घटना मंगळवारी (दि.१) सायंकाळी पावणेआठच्या सुमारास शनि मंदिराजवळ आंबेवाडी कान्हे (ता. मावळ) येथे घडली. या घटनेने परिसरात खळबळ उडाली. काही काळ भीतीचे वातावरण निर्माण झाले होते.

वैभव उमेश सातकर (वय २२, रा. आंबेवाडी कान्हे, ता. मावळ) असे खून झालेल्या तरुणाचे नाव आहे. अंकुश जयवंत सातकर (वय ४२, रा. आंबेवाडी कान्हे ता. मावळ) असे खून केलेल्या आरोपीचे नाव आहे. वडगाव मावळ पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मयत वैभव




सातकर व आरोपी अंकुश सातकर दोघे शेजारी राहत असून, मयत वैभव सातकर याचे अनैतिक संबंध असल्याने आरोपी अंकुश सातकर याने धारदार कोयत्याने वैभव याच्या मानेवर अनेक वार केले. यात गंभीर जखमी झाल्याने जागीच मृत्यू झाला. आरोपी अंधाराचा फायदा घेत पळून गेला.

दरम्यान, या घटनेची माहिती कळताच वडगाव पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक कुमार कदम, सहाय्यक पोलीस निरीक्षक शितलकुमार डोईजड, पोलीस उपनिरीक्षक ऋतुजा मोहिते व पोलिसांनी धाव घेतली. पंचनामा करून मृतदेह ताब्यात घेतला. शवविच्छेदन करण्यासाठी प्राथमिक आरोग्य केंद्रात रवाना केला. याप्रकरणी पुढील तपास वडगाव मावळ पोलिस करत आहे.

प्रेमप्रकरणातून तरूणाची निर्घृण हत्या

दुसऱ्या घटनेत, वाशिमच्या शिरपूर पोलिस ठाण्याच्या हद्दीतील चांडस येथे प्रेमप्रकरणातून एका तरुणाची निर्घृण हत्या करण्यात आल्याने एकच खळबळ उडाली. महेश रुपराव हाडे (वय ३५, रा. गोहगाव हाडे) असे तरुणाचे नाव असून, ही घटना रविवारी (दि. ९) घडली. याप्रकरणी शिरपूर पोलिसांनी ८ जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला असून, यापैकी ५ जणांना पोलिसांनी अटक केली आहे. याबाबत मृतकाच्या भावाने सोमवारी (दि. १०) शिरपूर पोलिसात तक्रार दिली आहे.

# नंदू नाईकवरील स्थानबद्धतेची कारवाई रद्द; शासनाकडून पुणे पोलिसांच्या एमपीडीए कारवाईला ब्रेक



**पुणे । प्रतिनिधी**

अवैध धंद्यातील किंग म्हणून ओळखल्या जाणाऱ्या नंदकुमार बाबुराव नाईक याच्यावर पुणे पोलिसांनी केलेली स्थानबद्धतेच्या (एमपीडीए) कारवाईला शासनाने रद्द केले आहे. गृहविभागानेच एमपीडीए रद्द केल्याने आठ दिवसातच नंदू नाईक कारागृहातून बाहेर आला आहे. विशेष म्हणजे, नागपूरहून नंदू नाईक थेट विमानाने पुण्यात आला. तो पुण्यात आल्यानंतर परिसरात फटाके देखील वाजविल्याची जोरदार चर्चा पोलीस दलात आहे. यामुळे पुणे पोलिसांवर पुन्हा एकदा नामुश्की ओढावली आहे.

पुण्याचा मध्यभाग असलेला शुक्रवार पेठ परिसरात म्हणजेच खडक पोलीस स्टेशनच्या हद्दीत नंदू नाईक अवैधरित्या मटका, जुगार व इतर अवैध धंदे चालवत होता. पूर्ण शहरात मटका किंग म्हणून त्याची ओळख होती. त्याच्याविरोधात खडक पोलीस ठाण्यात एकूण ६३ गुन्हे नोंद आहेत, त्यापैकी २०२१ पासूनच अवैध मटका आणि जुगारासंदर्भात १२ गुन्हे दाखल आहेत. पुणे पोलिसांनी वेळोवेळी छापे टाकून त्याच्या जुगारावर कारवाई केली, मात्र तरीही त्याच्या गुन्हेगारी वर्तनात सुधारणा झाली नव्हती. या पार्श्वभूमीवर खडक पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक शशिकांत चव्हाण यांनी त्याला स्थानबद्ध करण्याचा प्रस्ताव पोलीस आयुक्तांकडे पाठवला. या प्रस्तावाचा सविस्तर अभ्यास करून पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी १७ मार्च २०२५ रोजी नंदकुमार नाईकला नागपूर मध्यवर्ती कारागृहात स्थानबद्ध करण्याचे आदेश दिले होते. त्यानूसार त्याला नागपूर कारागृहात रवाना देखील केले होते.

नंदू नाईकच्या वतीने राज्य शासनाकडे (गृह विभाग) एमपीडीएच्या कारवाईबाबत दाद मागितली होती. शासनाने पुणे पोलिसांनी केलेली एमपीडीएची कारवाई रद्द केली, असे वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सांगितले. दरम्यान, रद्दतेचे कारण समजू शकले नाही. मात्र, पुणे पोलिसांवर यामुळे मोठी नामुश्की ओढावली आहे.

मोक्कानुसारही मिळाला होता जामीन

मटका किंग म्हणून नंदू नाईक प्रसिद्ध आहे. शहर व ग्रामीण भागातही त्याला ओळखले जाते. चार वर्षांपूर्वी एका खून प्रकरणात बंडू आंदेकर टोळीवर मोक्का कारवाई केली होती. तेव्हा नंदू नाईक याची टोळीला आर्थिक रसद असल्यावरून मोक्का कारवाई झाली होती. मात्र नंतर हा मोक्काच न्यायालयात टिकला नाही. त्यापूर्वीच नंदू नाईकने याप्रकरणातही न्यायालयातून जामीन मिळवला होता. फटाके वाजवून स्वागत..!

एमपीडीएची कारवाई रद्द झाल्यानंतर नंदू नाईक नागपूरहून थेट विमानाने पुण्यात दाखल झाला. तो पुण्यातील त्याच्या घरी आल्यानंतर फटाके वाजवून त्याचे स्वागत झाल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. एमपीडीए कारवाई झाल्यानंतर संबंधिताला राज्य शासन तसेच सर्वोच न्यायालयात दाद मागण्यास वाव असतो. या पातळ्यावर दाद मागितल्यानंतर एमपीडीएच्या कायद्यानुसार कारवाई झाली का, याची तपासणी होते. त्यानूसार शासन किंवा न्यायालय जामीन किंवा तो रद्द करतात.

# पुण्यात भीषण अपघात; भरधाव दुचाकी घसरून तरुणाचा मृत्यू

**पुणे । प्रतिनिधी**

वारजे माळवाडी परिसरात भरधाव दुचाकी घसरून सहप्रवासी तरुणाचा मृत्यू झाल्याची घटना मुंबई-बंगळुरू बाह्यवळण मार्गावर घडली आहे. याप्रकरणी दुचाकीस्वारावर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. जय भगवान अवघड (वय २२, सध्या रा. अक्षरा पीजी. लक्ष्मी चौक, हिंजवडी फेज एक) असे मृत्यू झालेल्या सहप्रवासी तरुणाचे नाव आहे. अपघातात दुचाकीस्वार शुभम भाऊसाहेब काकडे (वय २४, सध्या रा. अक्षरा पीजी. लक्ष्मी चौक, हिंजवडी, फेज एक) जखमी झाला आहे. याबाबत जय याचे वडील भगवान सुखदेव अवघड (वय ४८,रा. वाकळुनी, ता. बदनापुर, जि. जालना) यांनी वारजे माळवाडी पोलिसांत तक्रार दिली आहे.

पोलिसांच्या माहितीनुसार, जय मूळचा जालना जिल्ह्यातील वाकळुनी गावचा रहिवासी आहे. रविवारी (३०



मार्च) दुपारी साडेबाराच्या सुमारास दुचाकीस्वार शुभम आणि त्याचा मित्र जय हे मुंबई-बंगळुरू बाह्यवळण मार्गावरुन निघाले होते. वारजेतील स्वीट कॉर्नर दुकानाजवळ भरधाव दुचाकीस्वार शुभमचे नियंत्रण सुटले. दुचाकी घसरल्याने सहप्रवासी जय याच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली, तसेच दुचाकीस्वार शुभम जखमी झाला. अपघाताची माहिती मिळताच पोलिसांनी येथे धाव घेतली. दोघांना तातडीने खासगी रुग्णालयात दाखल केले. परंतु, उपचारांदरम्यान जयचा मृत्यू झाला. अधिक तपास उपनिरीक्षक नाईकवाडे करत आहेत.

भरधाव वाहनाच्या धडकेत ज्येष्ठ नागरिकाचा मृत्यू

भरधाव वाहनाच्या धडकेत ज्येष्ठ नागरिकाचा मृत्यू झाल्याची घटना डेक्कन जिमखाना भागात घडली आहे. अरुण शंकर जोशी (वय ६०, रा. विवेकश्री बिल्डींग, राजेंद्रनगर, सदाशिव पेठ) असे मृत्यू झालेल्या ज्येष्ठाचे नाव आहे. अपघातानंतर पसार झालेल्या वाहनचालकावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत अंकिता अनिल जोशी (वय २१, रा. विवेकश्री बिल्डींग, राजेंद्रनगर, सदाशिव पेठ) यांनी डेक्कन पोलीस ठाण्यात तक्रार दिली आहे.

हायड्राक्रेनच्या धडकेने वयोवृद्ध महिलेचा मृत्यू

हायड्राक्रेन वाहनाच्या धडकेने एका ८० वर्षांच्या वयोवृद्ध महिलेचा मृत्यू झाल्याची घटना नुकतीच विलेपार्ले परिसरात घडली आहे. बिना अनिल मथुरे असे या मृत वयोवृद्ध महिलेचे नाव आहे. महिलेच्या मृत्यूप्रकरणी क्रेन चालक अरविंद कमलेश यादव याच्याविरुद्ध जुहू पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. अपघातानंतर अरविंद हा घटनास्थळाहून पळून गेला होता. रात्री शुक्रवारी उशिरा त्याला पोलिसांनी चौकशीसाठी ताब्यात घेतल्याचे बोलले जात आहे. हा अपघात गुरुवारी दुपारी दोन वाजता विलेपार्ले येथील इर्ला मार्केट, तानाजी मालुसरे मार्ग, प्राईम मॉलसमोर झाला आहे. बिना मथुरे या महिला विलेपार्ले येथील पोस्ट ऑफिसजवळील गणेश मूर्ती गार्डन शोरुमजवळ राहते. गुरुवारी दुपारी त्या इर्ला मार्केटमध्ये गेल्या होत्या. प्राईम म शोरुमसमोरुन जात असताना एका हायड्राक्रेन चालकाने हलगर्जीपणाने गाडी चालवून बिना यांना जोरात धडक दिली होती. या अपघातात त्या गंभीररीत्या जखमी झाल्या होत्या. अपघातानंतर क्रेनचालकाने जखमी महिलेस कुठलीही वैद्यकीय मदत केली नाही.